दैनिक

# राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिध्द

संपादक : काकासाहेब नवले | RNI No. MAHMAR/2019/82605 | वर्ष ७ वे | पाने ८ | मुल्य रू. ४.०० | अंक ३५१ | सोमवार ०५ ऑक्टोबर २०२६

| पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 | www.rashtrasahyadri.com


## आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताची ८५ पदकांसह मोहीम संपली

**नवी दिल्ली :** आशियाई क्रीडा स्पर्धा २०२६ मध्ये भारताची पदक मोहीम शनिवारी संपुष्टात आली. जपानमधील आयची-नागोया येथे झालेल्या या स्पर्धेत भारतीय खेळाडूंनी दमदार कामगिरी करत एकूण ८५ पदकांची कमाई केली. यामध्ये २१ सुवर्ण, २७ रौप्य आणि ३७ कांस्यपदकांचा समावेश आहे.या स्पर्धेत भारतीय खेळाडूंनी विविध क्रीडा प्रकारांत आपले कौशल्य सिद्ध करत देशाचा तिरंगा अभिमानाने उंचावला. सुवर्णपदकांसह रौप्य आणि कांस्यपदकांचीही मोठी संख्या मिळाल्याने भारताच्या पदकतालिकेतील कामगिरीला विशेष महत्त्व प्राप्त झाले. खेळाडूंनी दाखवलेली जिद्द, मेहनत आणि चिकाटी यामुळे भारतीय क्रीडाक्षेत्रासाठी ही स्पर्धा महत्त्वपूर्ण ठरली. आशियातील विविध देशांतील अव्वल खेळाडूंशी झालेल्या चुरशीच्या लढतींमध्ये भारतीय खेळाडूंनी आपली क्षमता दाखवून दिली. एकूण ८५ पदकांसह भारताची आशियाई क्रीडा स्पर्धेतील मोहीम पूर्ण झाली असून, या कामगिरीमुळे भारतीय खेळाडूंच्या मेहनतीचे आणि क्रीडा क्षेत्रातील प्रगतीचे दर्शन घडले.

# १३ कोटी मतदार बेकायदेशीरपणे वगळले

## ठाकरे बंधूंची 'गर्जना' मतदार यादीपासून निवडणूक आयोगावर हल्लाबोल

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** मुख्य निवडणूक आयुक्तांच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत लोकशाही आणि संविधानाच्या रक्षणासाठी आज मुंबईत शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि मनसे प्रमुख राज ठाकरे एकत्र आले. 'गर्जना मोर्चा'च्या माध्यमातून ठाकरे बंधूंनी केंद्र सरकार आणि केंद्रीय निवडणूक आयोगाच्या कारभारावर जोरदार टीका केली. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेससह राज्यातील विविध विरोधी पक्षांच्या नेत्यांनीही मोर्चाला उपस्थित राहून पाठिंबा दिला. मेट्रो सिनेमा ते मुंबई महापालिका मुख्यालय असा मोर्चा काढण्यात आला.

उद्धव ठाकरे यांनी हा लढा कोणत्याही एका पक्षाचा, व्यक्तीचा, जात किंवा धर्माचा नसून स्वातंत्र्याचा लढा असल्याचे सांगितले. निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकतेवर प्रश्न उपस्थित करत त्यांनी मतदार यादीतील वगळण्यात आलेल्या मतदारांचा मुद्दा उपस्थित केला. राज ठाकरे यांनी मांडलेल्या आकडेवारीचा संदर्भ देत महाराष्ट्रातील सुमारे दोन कोटी आणि देशभरातील १३ कोटी मतदार वगळल्याचा दावा त्यांनी केला. पश्चिम बंगाल आणि तामिळनाडूमधील मतदारांच्या संदर्भातील प्रक्रियेवरही त्यांनी प्रश्न उपस्थित केले. निवडणूक आयुक्तांच्या नियुक्तीच्या प्रक्रियेवरही उद्धव ठाकरे यांनी आक्षेप घेतला. पूर्वीच्या निवड समितीत सरन्यायाधीशांचा समावेश होता; मात्र त्याऐवजी केंद्र सरकारच्या मंत्र्यांचा समावेश करण्यात आल्याची टीका त्यांनी केली. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या नियुक्तीवरही त्यांनी पक्षपातीपणाचा आरोप केला. हे आरोप उद्धव ठाकरे यांनी मोर्चातील भाषणात केले.

'मतदानाचा अधिकार काढून घेण्याचा प्रयत्न होत असेल, तर जनता शांत बसणार नाही,' असा इशारा देताना ठाकरे यांनी निवडणूक आयोगासह सरकारी यंत्रणांवरही टीका केली. महाराष्ट्रातील कायदा-सुव्यवस्था, महिला अत्याचार आणि उद्योगांशी संबंधित प्रश्न उपस्थित करत त्यांनी राज्य सरकारला लक्ष्य केले. दरम्यान, मोर्चाला झालेली गर्दी आणि विरोधकांचा सहभाग यामुळे मुंबईतील राजकीय वातावरणही तापले.



### '२०१७ पासून मतचोरीचा मुद्दा मांडतोय' : राज ठाकरे

मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी २०१७ पासून निवडणुकांमध्ये मतचोरी होत असल्याचे सांगत असल्याचा दावा केला. याबाबत आपण सोनिया गांधी आणि ममता बॅनर्जी यांच्यासह विविध नेत्यांची भेट घेतल्याचे त्यांनी सांगितले. २०२४ च्या निवडणुकीत महाराष्ट्रात महायुतीला बहुमत मिळाले, मात्र अपेक्षित जल्लोष दिसला नाही, असा दावा करत त्यांनी लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांमध्ये मतदारसंख्येत मोठी वाढ झाल्याचा मुद्दा उपस्थित केला. महाराष्ट्रात ४० ते ६० लाख मतदार वाढल्याचा तसेच दोन्ही निवडणुकांमध्ये मिळून सुमारे एक कोटी मतांची वाढ झाल्याचा दावा त्यांनी केला. या आकडेवारीची सखोल चौकशी होण्याची गरज असल्याचे राज ठाकरे म्हणाले.

## 'पुणे शिक्षक'वरून महायुतीतील संबंध ताणले!

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



### मंगेश चिवटे लढणारच; उदय सामंत यांची घोषणा

**कोल्हापूर :** पुणे शिक्षक मतदार संघातून एकनाथ शिंदे शिवसेनेकडून मंगेश चिवटे हेच उमेदवार असतील, अशी स्पष्ट भूमिका उद्योग मंत्री उदय सामंत यांनी येथे रविवारी व्यक्त केली. तर, मंगेश चिवटे यांनी आपण मंगळवारी उमेदवारी अर्ज भरणार असल्याचे स्पष्ट केले आहे.

यामुळे या मतदारसंघात भाजपने स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांना उमेदवारी दिली असली तरी महायुती अंतर्गत मतभेद ताणले असल्याचे स्पष्ट झाले आहे.

पुणे शिक्षक मतदार संघासाठी महायुती अंतर्गत जोरदार स्पर्धा सुरू होती. कौस्तुभ गावडे यांनी गेल्या आठवड्यात निवडणुकीसाठी प्रचाराचा नारळ फोडला होता. तर शिवसेनेचे मंगेश चिवटे यांनी पंधरा दिवसापासून प्रचाराची मोहीम उघडली आहे. त्यांनी पुणे शिक्षक मतदार संघातील सर्व पाच जिल्ह्यात मेळावे घेऊन शक्तिप्रदर्शन केले होते. यामुळे या दोघांपैकी उमेदवारीची चुरस रंगली होती. अखेर आज भाजपने कौस्तुभ गावडे यांना उमेदवारी जाहीर केली आहे. यानंतर महायुती अंतर्गत मतभेद स्पष्टपणे समोर आले आहेत.

याबाबत बोलताना उद्योग मंत्री उदय सामंत म्हणाले की, एकनाथ शिंदे शिवसेनेकडून मंगेश चिवटे हेच उमेदवार असतील. भाजपने कोणाला उमेदवारी दिली आहे हा त्यांचा अंतर्गत विषय आहे.दरम्यान मंगेश चिवटे यांनी निवडणूक लढवण्याचा निर्धार कायम ठेवला आहे. त्यांनी सांगितले की, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आम्हाला उमेदवारी अर्ज भरण्याच्या सूचना केल्या आहेत. त्यानुसार येत्या मंगळवार,६ ऑक्टोबर जोरदार शक्ती प्रदर्शन करीत अर्ज दाखल करणार आहोत. एकनाथ शिंदे जो आदेश देतील तो शिरसावंद्य आहे. आमच्यासारख्या कार्यकर्त्यांना तो मान्य आहे. भाजपने उमेदवारांची यादी जाहीर (पान ४ वर)

## महत्त्वाचे..

### पावणेतीन लाख लोकसंख्येसाठी सध्या १५० टँकरद्वारे पाणीपुरवठा

**अहिल्यानगर :** पावसाने पाठ फिरवल्याने जिल्ह्यातील पाणीटंचाई दिवसेंदिवस गंभीर होत असून, पावणेतीन लाख लोकसंख्येसाठी सध्या १५० टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. दोन दिवसांपूर्वी श्रीगोंदा तालुक्यातील चार गावे आणि ४९ वाड्यांमध्ये पाणीटंचाई निर्माण झाल्याने १२ हजार ७७० नागरिकांसाठी चार टँकर सुरू करण्यात आले आहेत.

जिल्ह्यात एप्रिलपासून टँकर सुरू असून मेअखेर १६२ टँकर धावत होते. जुलैमध्ये झालेल्या समाधानकारक पावसामुळे सुमारे ६० टँकर कमी झाले होते. मात्र ऑगस्ट आणि सप्टेंबरमध्ये पावसाने दडी मारल्याने भूजलपातळी खालावली आणि टंचाईची परिस्थिती पुन्हा गंभीर झाली. याशिवाय संगमनेर, नेवासा, अहिल्यानगर, शेवगाव, कर्जत, जामखेड व पारनेर तालुक्यांतही टँकरने पाणीपुरवठा सुरू आहे. गेल्या काही दिवसांत संगमनेरमध्ये एक, पाथर्डीत तीन, शेवगावात तीन आणि कर्जतमध्ये दोन टँकर वाढले आहेत. जिल्ह्यात चार महिन्यांच्या पावसाळ्यात २९९ मिलिमीटर म्हणजेच ६६.७२ टक्के पाऊस झाला असल्याने आगामी काळात टंचाई आणखी वाढण्याची शक्यता आहे.

## 'धर्म-जात नव्हे, शिक्षण-रस्ते-रोजगारासाठी मत द्या!'

### मतदान कशासाठी करायचे, याची जाणीव जनतेत निर्माण होणे गरजेचे : अभिजित दिपके

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** सायन्स आणि मॅथ्सची पुस्तके मोठी असतात; मात्र नागरिक कसा घडावा, त्याचे अधिकार आणि मूलभूत जबाबदाऱ्या सांगणारे नागरिकशास्त्राचे पुस्तक तुलनेने छोटे असते. यामुळेच नागरिकांच्या मूलभूत अधिकारांबाबत आणि जबाबदाऱ्यांबाबत अजूनही पुरेशी जाणीव निर्माण झालेली नाही.

मतदान करताना धर्म किंवा जात धोक्यात असल्याच्या भावनेपेक्षा आपल्या शिक्षण, रोजगार, रस्ते, परीक्षा व्यवस्था आणि भविष्यासाठी मतदारांनी प्रश्न विचारायला हवेत, असे मत कॅरोकॉच जनता पार्टीचे संस्थापक अभिजित दिपके यांनी व्यक्त केले.

रोहित पवार यांच्या पुण्यातील विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला भेट दिल्यानंतर दिपके यांनी विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा प्रश्न उपस्थित केला. एवढ्या विद्यार्थ्यांचे भविष्य पणाला लागले असताना काही चुकीचे झाले असेल तर जबाबदारी निश्चित करून राजीनामा का घेतला जात नाही, असा सवाल त्यांनी केला. यावेळी त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावरही टीका केली. विविध नियुक्त्यांवरून प्रश्न उपस्थित (पान ४ वर)



### भ्रष्टाचार, घोटाळा आणि भेसळ

देवेंद्र फडणवीस म्हणतात, 'आम्ही सगळ्या मागण्या मान्य केल्या, मग इथं मुलं का बसली आहेत? असा सवाल शिवसेना खासदार संजय राऊत यांनी केला. हे जंतर-मंतर जर पुन्हा दुसऱ्यांदा प्रत्येक जिल्ह्यात-जिल्ह्यात जर निर्माण झालं, तर तुमची गाडी मंत्रालयाबाहेर पडणार नाही, वर्षाबाहेर पडणार नाही, मंत्र्यांच्या बंगल्याबाहेर पडणार नाही, अशा शब्दात राऊत यांनी इशारा दिला.

## श्रीरामपूर गुन्हेगारीविरोधातील लढा थांबणार नाही

### मोक्का कारवाई केवळ सुरुवात; आमदार ओगले, नगराध्यक्ष ससाणे, प्रकाश चित्ते यांचा निर्धार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** शहरातील वाढत्या संघटित गुन्हेगारीविरोधात झालेली मोक्का कारवाई हा लढ्याचा केवळ पहिला टप्पा असून, शहर पूर्णपणे गुन्हेगारीमुक्त होईपर्यंत संघर्ष सुरूच ठेवणार असल्याचा निर्धार आमदार हेमंत ओगले, नगराध्यक्ष करण ससाणे व शिवसेनेचे ज्येष्ठ नेते प्रकाश चित्ते यांनी व्यक्त केला.

महात्मा गांधी जयंतीदिनी महात्मा गांधी चौकात प्रकाश चित्ते व मयत आकाश दुबय्या यांचे बंधू कुणाल दुबय्या यांनी गुन्हेगारीविरोधात उपोषण सुरू केले होते. त्यानंतर आमदार ओगले व नगराध्यक्ष ससाणे यांनीही सहभाग घेतला. शनिवारी रात्री पोलिसांनी गोरख जेधे, सोन्या बेग, अंकुश जेधे व मनोज साबळे यांच्याविरोधात मोक्का कारवाई केल्याचे लेखी पत्र दिल्यानंतर उपोषण स्थगित करण्यात आले. यापूर्वी सकल श्रीरामपूरकरांनी चार दिवसांचा बंद पाळून तसेच विराट मोर्चा काढून प्रशासनाचे लक्ष वेधले होते. मात्र अपेक्षित कारवाई न झाल्याने उपोषणाचा मार्ग स्वीकारावा लागला, असे आंदोलकांनी सांगितले.

या आंदोलनाला शरद पवार, सुप्रिया सुळे, विजय वडेट्टीवार, बाळासाहेब थोरात, राधाकृष्ण विखे पाटील, (पान ४ वर)

## भीषण अपघातात बाप लेकीसह तिघांचा मृत्यू

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**संभाजीनगर :** राज्य परिवहन महामंडळाची बस व दुचाकी वाहनामध्ये झालेल्या एका भीषण अपघातात पाच वर्षांच्या चिमुकलीसह तिघांचा मृत्यू झाला. ही घटना पैठण शहरातील नाका टू नाका या रस्त्यावर रविवारी दुपारी ३ च्या सुमारास घडली. कृष्णा अशोक गायकवाड (वय २५, रा. राक्षी ता. शेवगाव), छकुली कृष्णा गायकवाड (वय ५) व अशोक रमेश भालेराव (३५ रा. अंतरवाली जालना) अशी मृतांची नावे आहेत.



मिळालेल्या माहितीनुसार, कृष्णा गायकवाड आणि अशोक भालेराव हे दुचाकीवरून पैठण येथे आले होते. ते परत गावी जात असताना त्यांच्या दुचाकीची व बस धडक झाली. हा अपघात इतका भीषण होता की तिघांचाही जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली.

अपघाताची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. गंभीर जखमी अवस्थेत तिघांनाही नजीकच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दाखल केलेल्या तिघांनाही मृत घोषित केले. या घटनेमुळे नांदर आणि जालना परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. अपघाताची नोंद करण्याची प्रक्रिया पोलिसात रविवारी रात्रीपर्यंत सुरू होती. पुढील तपास पोलिसांकडून करण्यात येत आहे.

## जिल्हा बँकेसाठी थोरात-विखे-राम शिंदे एकत्र बसून तोडगा काढणार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**वैयक्तिक मत**

**अहिल्यानगर :** अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीची प्रक्रिया सुरू असतानाच संगमनेर येथे काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीने सहकार क्षेत्रातील राजकीय हालचालींना वेग आला आहे. या पार्श्वभूमीवर भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष तथा माजी खासदार सुजय विखे पाटील यांनी महत्त्वाचे भाष्य केले.

जिल्हा बँकेसाठी अर्ज भरण्याची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे आणि बाळासाहेब थोरात हे तिघे एकत्र बसून सर्वांना विश्वासात घेऊन तोडगा काढतील, असे सुजय विखे यांनी सांगितले. कोणत्याही नेत्याला किंवा घटकाला दूर ठेवले जाणार नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

थोरात यांनी जिल्हा बँकेच्या संदर्भात संगमनेर येथे बैठक बोलावली होती. आपल्यासह इतरांनाही बैठकीसाठी संपर्क करण्यात आला होता. तसेच जामखेड येथील दुष्काळी आढावा बैठकीनंतर राधाकृष्ण विखे पाटील व थोरात यांच्यात चर्चा झाल्याचे त्यांनी सांगितले.

# नांदूर निंबादैत्यला लोकसहभागातून चारा डेपो

## राज्यातील पहिलाच उपक्रम महिन्याभरापासून सुरू

अविनाश मंत्री । राष्ट्र सह्याद्री

**पाथर्डी :** तालुक्यात सध्या पाणीटंचाई बरोबरच तीव्र चारा टंचाई निर्माण होऊन पशुधन वाचवायचे कसे असा प्रश्न शेतकऱ्यांना पडला आहे. तालुक्यातील नांदूर निंबादैत्य येथील शेतकऱ्यांनी बळीराजा प्रतिष्ठानच्या माध्यमातून आपली समस्या काही अंशी आपणच सोडवण्याचा प्रयत्न सुरू करत गेल्या महिन्याभरापासून तेथे लोकसहभागातून चारा डेपो सुरू झाला आहे. राज्यात प्रथमच अशा प्रकारचा उपक्रम नांदूर येथे सुरू झाला आहे.

तालुक्यात सध्या अन्नधान्याबरोबरच चाऱ्याचे भाव गगनाला भिडून दुभत्या जनावरांसह दावणीतील जनावरे जगवायची कशी अशा प्रश्न शेतकऱ्यांना पडला आहे. मागील वर्षी अतिवृष्टीने पीक हातचे गेले, यावर्षी अनावृष्टीने हातात काही साधले नाही. त्यामुळे चारा कोठेही शिल्लक राहिला नाही. ज्या शेतकऱ्याकडे जेमतेम पाणी आहे तेथे मका, कडवळ, घास अशी चारा पिके तालुक्यात असली तरी ती सुद्धा आता अखेरच्या घटका मोजत आहेत. चाऱ्यासाठी उसाचा भाव आजच साडेतीन हजार रुपये प्रति टन एवढा झाला आहे.



तालुक्यातील नांदूर हे गाव ग्रामदैवत निंबादैत्याच्या नावावरून ओळखले जाते. भगवानगडाच्या पायथ्याला गाव असल्याने या गावावर भगवान बाबांचे संस्कार रुजलेले आहेत.स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे स्थानिक शाखेचे अध्यक्ष विकास वाघ यांनी मित्र शिवाजी नरसाळे, साईनाथ वाघ, विश्वास देशमुख, अर्जुन ढोले, अशा सुमारे दहा पंधरा नि:स्वार्थ भावनेने काम करणाऱ्या कार्यकर्त्यांबरोबर पशुधन जगवायचे कसे याबाबत चर्चा केली. सध्याच्या परिस्थितीमध्ये बळीराजाला पशुधन वाचविण्यासाठी आधार दिला नाही, तर गावातील जनावरांच्या दावणी नवीन वर्ष बघतील असे वाटत नाही. असा विचार करत लोकसहभागातून चारा डेपोची कल्पना पुढे आली. सध्या शेतकऱ्यांच्या हाताला काम नाही, शेताला पाणी नाही, घरात खायला धान्य नाही, मदतीला अजून कोणी धावले नाही, दुधाचा एकमेव धंदा शेतकऱ्यांना दोन घास मिळवून देणारा आहे. त्यामुळे कार्यकर्त्यांनी पदरमोड करत, लोक सहभाग स्वीकारत पोळ्याच्या दिवशी गावात चारा डेपो सुरू केला. प्रतिदिन चार ते पाच टन चारा पाथर्डी बाजार समिती, चारा बाजार, खाजगी अन्य गावचे शेतकरी, ऊस उत्पादक शेतकरी यांच्याकडून विकत घेऊन प्रति जनावर (पान ४ वर)

■ बळीराजा प्रतिष्ठानकडून आमच्या जनावरांना मोफत चारा दिला जातो. बैलपोळ्याच्या दिवशी चाऱ्याची उपलब्धता झाल्याने जनावरे सांभाळण्याची आमची तयारी झाली. पोटच्या पोराप्रमाणे आम्ही जनावरांना जीव लावतो. अन्न पाण्या वाचून जनावरे तडफडताना बघताना सुद्धा आमचे डोळे भरून येतात. चारा डेपो व तेथील कार्यकर्त्यांच्या सेवाभावी पद्धतीमुळे आम्हाला सुद्धा जगण्याचे बळ मिळाले आहे. आतापर्यंत डेपोच्या चालकांनी एक रुपया सुद्धा चाऱ्याच्या बदल्यात घेतलेला नाही.

**– आसाराम देशमुख, ज्येष्ठ शेतकरी**

### पालक मंत्र्यांनी वेधले प्रशासनाचे लक्ष

आतापर्यंत गेल्या शतकामध्ये अति तीव्र स्वरूपाचे बारा दुष्काळ पडले. या सर्वांमध्ये यंदाचा दुष्काळ अत्यंत भीषण व भयानक आहे. बळीराजाच्या अस्तित्वाचा प्रश्न तालुक्यात निर्माण झाला आहे. अशा परिस्थितीत नांदूर येथील लोकसहभागातून चालू असलेला चारा डेपो म्हणजे दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना जगण्यासाठी आशेचा किरण ठरत आहे. या पार्श्वभूमीवर पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांचेही नांदूर येथील लोकसहभागातून चालणाऱ्या चारा डेपोकडे लक्ष वेधले.

# जिल्हा बँक : बिनविरोध निवडणुकीचा तकलादू 'दुष्काळ' फंडा !

राज्यातच नव्हे, तर संपूर्ण आशिया खंडात सहकार क्षेत्रातील अग्रेसर बँक म्हणून अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची ओळख आहे. या बँकेची स्थापना १९५८ मध्ये झाली. प्रारंभी मोतीलाल फिरोदिया यांच्या नेतृत्वाखाली प्रशासकीय मंडळ होते. बँकेच्या संचालक मंडळाची पहिली निवडणूक १९६२-६३च्या दरम्यान झाली. जामखेडचे साहेबराव पाटील हे पहिले चेअरमन झाले. त्यानंतर जिल्हा बँकेच्या अनेक निवडणुका झाल्या. मात्र, दुष्काळाचे कारण देऊन कधीच निवडणूक बिनविरोध झाल्याचे दिसत नाही.









दुष्काळ तर या जिल्ह्याच्या पाचवीलाच पूजलेला. त्यामुळे निवडणुका पुढे ढकलल्या गेल्या असतील; मात्र त्या बिनविरोध झाल्या नव्हत्या. यावेळी मात्र निवडणूक बिनविरोध होण्याची शक्यता फारच धूसर दिसते. इच्छुक उमेदवारांची संख्या 'न भूतो' अशी असल्याने बिनविरोधाचा प्रस्थापितांचा फंडा फेल ठरणार, असेच सध्याचे रंग दिसत आहेत.

त्यातही ही निवडणूक प्रस्थापित विरुद्ध विस्थापित अशीच होत आहे. असा राजकीय संघर्ष जिल्हा बँकेच्या इतिहासात पहिल्यांदाच होणार असून, पक्षविरहित निवडणुकीच्या परंपरेलाही छेद बसण्याची शक्यता आहे.

**जामखेड केंद्रबिंदू**

बँकेची पहिली निवडणूक १९६२-६३ मध्ये झाली. राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांचे निकटवर्तीय असलेले जामखेडचे साहेबराव पाटील हे पहिले चेअरमन झाले. जिल्ह्यातील सहकार उत्तर नगर भागात फोफावला असला, तरी बँकेच्या सत्तेचा केंद्रबिंदू सातत्याने जामखेडभोवतीच फिरत राहिला.

साहेबराव पाटील, गोपाळराव सोले पाटील, आबासाहेब निंबाळकर आदी दिग्गजांनी बँकेत नेतृत्व केले. सोलेदादांकडे राज्यातील वेगवेगळ्या तब्बल १८ सहकारी संस्थांचे नेतृत्व होते. एकेकाळी सोले पाटील हेच बाळासाहेब विखे यांच्या सहकारातील राजकारणाचे हुकमी एक्का होते.

पुढे राजकारण बदलत गेले, हा भाग वेगळा. आता त्याच राजकारणाची पुनरावृत्ती विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांच्या माध्यमातून होऊ पाहत असून, सहकाराचा केंद्रबिंदू पुन्हा जामखेडकडे सरकू लागला आहे.

प्रा. राम शिंदे पहिल्यांदाच जिल्हा बँकेच्या राजकारणात विशेष सक्रिय झाले आहेत. अर्थात, हे धाडस मुख्यमंत्री फडणवीस यांच्या 'ग्रीन सिग्नल'शिवाय करणे शक्यच दिसत नाही. शिंदे हे विखे यांच्या राजकारणाला खरा अडसर ठरू शकतात. त्यापेक्षाही तब्बल ६८ वर्षांनंतर राज्यातील सभापती फिरोदिया यांच्यानंतर विद्यमान सभापती प्रा. राम शिंदे जिल्हा बँकेच्या राजकारणात सक्रिय होत आहेत, ही बाब आवर्जून लक्षात घ्यावी लागेल.

**बिनविरोधाचा फंडा**

जिल्हा बँकेच्या यापूर्वीच्या निवडणुका दुष्काळामुळे कधीच बिनविरोध झालेल्या नाहीत. १९७२च्या दुष्काळी पार्श्वभूमीवरही निवडणूक झालीच होती. बिनविरोध निवडणुकीचा पायंडा जिल्हा बँकेत नव्हता आणि नाही, असा ढोबळमानाने निष्कर्ष काढता येतो. सोसायटी मतदारसंघाच्या काही जागा बिनविरोध जरूर होतात; मात्र संपूर्ण निवडणूक बिनविरोध होणे ही क्वचितच घडणारी बाब असावी.

जिल्हा बँकेत पूर्वी संचालक मंडळाच्या २७ जागा होत्या. आता त्या २१ झाल्या असून, त्यापैकी १४ जागा सोसायटी मतदारसंघाच्या आहेत. ज्या नेत्याचा ज्या भागात प्रभाव, त्या नेत्याकडे ती जागा जाते. मात्र, खरी चुरस सात जागांसाठीच असते. या सात जागांच्या आधारेच सत्तेचे पारडे झुकते. त्यामुळे त्यासाठी चुरस कायम राहते.

दुष्काळातील निवडणूक खर्चाचा मुद्दा पुढे करून बिनविरोधाचा फंडा राबविला जात आहे. त्यात थोरात, विखे आणि गडाख या प्रस्थापित नेत्यांनी पुढाकार घेतला आहे. एकमेकांना विरोध करणारे नेते बिनविरोधासाठी सहमती दर्शवत असतील, तर त्यामागचे इंगित वेगळे असावे.

त्यांच्यापुढे पहिल्यांदाच विस्थापितांचे आव्हान उभे राहिले आहे. त्यामुळेच दुष्काळातील निवडणूक खर्चाचा मुद्दा पुढे केला जात असल्याचे दिसते. पण बँकेच्या निवडणुकीसाठी १५ लाख रुपयांपेक्षा जास्त खर्च होत नाही, असे सांगितले जाते. मग त्याचा एवढा बाऊ करण्यात काय हशील?

**थोरात यांचा 'सोधा'**

जिल्हा बँकेच्या राजकारणावर स्वर्गीय भाऊसाहेब थोरात यांचा मधल्या काळात प्रचंड दबाव होता. बँकेच्या राजकारणात ते म्हणतील

अतिथी संपादकीय
**रामदास ढमाले**
ज्येष्ठ पत्रकार
मो. नं. ८९९९८१०००३

तीच पूर्व दिशा ठरायची. असा एक काळ होता. त्यांच्यानंतर बाळासाहेब थोरात यांच्याकडे नेतृत्व आले. ते बँकेचे संचालक झाले नाहीत; मात्र बँकेच्या राजकारणाचे सूत्रसंचालन स्वतःकडे ठेवले.

त्यांचे नातेसंबंध आणि सोयरसंबंध जिल्ह्यातील अत्यंत प्रभावी घराण्यांशी आहेत. राजळे, कडू, गडाख, शेळके, तांबे यांच्यासह घुले, तनपुरे आणि काळे यांच्याशी त्यांचे सूत जुळते. त्यांचे सोयरे-धायरे म्हणजेच 'सोधा' हा जिल्ह्याच्या राजकारणातील अंतर्गत प्रभावी पक्ष आहे.

या 'सोधा' लॉबीचा यापूर्वी शरद पवार यांनीही आवर्जून उल्लेख केला होता. याच 'सोधा' लॉबीच्या माध्यमातून सोसायटी मतदारसंघाबरोबरच इतर सात जागांवरही थोरात गटाचा प्रभाव पडतो. परिणामी, सत्ता केंद्र त्यांच्याकडे झुकते.

थोरात गट प्रामुख्याने संगमनेर, अकोला, नेवासा, पाथर्डी, पारनेर, शेवगाव आणि राहुरी या सोसायटीच्या जागांवर हुकूमत गाजवू शकतो. तसेच श्रीरामपूर, कोपरगाव आणि श्रीगोंदा येथेही काही प्रमाणात चमत्कार घडवू शकतो.

**विखेंना शिंदेंचा अडसर**

जिल्हा बँकेच्या राजकारणात विखे गट शक्यतो निर्णायक ठरत नाही; तर तडजोडीतून सत्ता हस्तगत करू शकतो. असाच राजकीय पूर्वेतिहास आहे.

वास्तविक, जिल्हा बँकेच्या प्रारंभिक काळात विखे आणि थोरात एकत्र होते. पद्मश्री विठ्ठलराव विखे आणि भाऊसाहेब थोरात एकाच वेळी अध्यक्ष आणि उपाध्यक्ष होते. मात्र, पुढे बँकेच्या राजकारणात विखे-थोरात गट आमनेसामने आले.

थोरात यांच्याबरोबर मारोतराव घुले, आबासाहेब निंबाळकर, शंकरराव काळे आणि फिरोदिया राहिले, तर विखेंची खिंड सोले पाटील यांनी लढवली. हांडे, म्हस्के (पाथर्डी), पाचपुते आणि इतर काही संचालकांच्या मदतीने राधाकृष्ण विखे आणि गोपाळराव सोले बँकेचे अध्यक्ष जरूर झाले; पण थोरात यांचे सत्ता केंद्र फारसे डळमळीत झाले नाही.

विखे गटाला प्रामुख्याने राहाता, जामखेड, श्रीगोंदा, कर्जत, श्रीरामपूर आणि पारनेर आदी ठिकाणांहून साथ मिळते. गेल्या वेळी जामखेडचे राळेभात विखेंबरोबर होते. पण यावेळी पहिल्यांदाच कर्जत-जामखेडमध्ये विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे प्रभावी ठरत आहेत.

श्रीगोंद्याचे जगताप आणि श्रीरामपूरही त्यांच्या बाजूने झुकण्याची शक्यता आहे. विखे गटाच्या प्रभावी क्षेत्रावर प्रा. राम शिंदे यांचा अडसर निर्माण झाल्यानेच थोरात, विखे आणि गडाख यांनी बिनविरोधाचा फंडा पुढे करून 'सहमती एक्स्प्रेस' पुढे केली आहे.

मात्र, इच्छुक उमेदवारांची गर्दी लक्षात घेता बिनविरोध होण्याची शक्यता मावळलेली दिसते. उलटपक्षी, प्रस्थापितांपुढे विस्थापितांनी तगडे आव्हान उभे केल्याचे चित्र दिसत आहे.

**पक्षीय शिरकाव**

स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांनी मुळा धरणाच्या उद्घाटनप्रसंगी राहुरीच्या कार्यक्रमात सहकारात येताना राजकीय जोडे बाजूला ठेवण्याचा मोलाचा सल्ला दिला होता. तो काही काळ तंतोतंत पाळला गेला. मात्र, गेल्या पंचवीस वर्षांपासून सहकारात राजकीय प्रभाव वाढत गेला.

पद्मश्री विखे पाटील यांनी हे तत्त्व अंगीकारले; मात्र पुढे त्याला इतर नेत्यांनी हरताळ फासला. सहकारातील सर्वच नेते राजकारणात सक्रिय झाले. विखे घराणेही त्याला अपवाद ठरले नाही.

कारखाना आणि जिल्हा बँकेत पक्षीय राजकारणाचा शिरकाव झाला. परिणामी, पूर्वी स्थानिक जिल्हा पातळीवर जे निर्णय घेतले जायचे, ते आता राज्य पातळीवरील नेते घेऊ लागले आहेत. त्यांच्या कलानेच आता सहकारातील राजकारण होऊ लागले आहे.

जिल्हा बँकेच्या राजकारणावर यापूर्वी स्वर्गीय अजितदादा पवार यांचा मोठा हस्तक्षेप असायचा. तोच कित्ता आता मुख्यमंत्री फडणवीस अप्रत्यक्षरीत्या गिरवत आहेत. मात्र, या घडामोडीत जिल्ह्यातील शिंदेसेना आणि पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस यांना बाजूला केल्याने शिंदेसेनेचे आमदार लंघे, खताळ, माजी आमदार मुरकुटे, हर्षदा काकडे आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदार निलेश लंके यांच्या भूमिकेला महत्त्व प्राप्त होणार आहे.

**(या लेखाचा पुढील भाग पुढील अंकात.)**

## मुळामाईची बालब्रह्मचारी सेंदौरे महाराज यांच्या हस्ते जलपुजन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**राहुरी :** नेवासा व राहुरी तालुक्यातील जीवनदायनी म्हणून संबोधले जाणाऱ्या मुळानदीला महाराष्ट्र राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या आदेशानुसार मुळाधरणाच्या पाण्यातुन मुळानदीवरील चार हि बंधारे केटीवेअर पुर्ण क्षमतेने भरले असून मांजरी येथे दि. ४ रोजी सकाळी ९ वा.बालब्रह्मचारी प्रकाश महाराज सैंदोरे व मुळाथडी पाणी आरक्षण कृती समिती, शेतकरी, ग्रामस्थ स्थानिक पदाधिकारी यांच्या हस्ते विधीवत जलपूजन करण्यात आले.यावेळी मांजरी ग्रामपंचायत उपसरपंच कोंडीराम विटनोर,भारत विटनोर,ग्रामपंचायत सदस्य तुषार विटनोर, गोरक्षनाथ विटनोर तुकाराम विटनोर, राऊसाहेब विटनोर, बाबासाहेब विटनोर, पांडुरंग जंगले,कृती समितीचे अध्यक्ष दत्तात्रय घोलप, उपाध्यक्ष भाऊसाहेब विटनोर, कार्याध्यक्ष नानासाहेब जुंधारे, खजिनदार विलास सैंदोरे,संघटक किरण जाधव, सहसचिव विठ्ठल जाधव, सचिव बाळासाहेब नवगिरे, सदस्य किशन विटनोर, विजय जंगले,रामभाऊ जाधव, बाबासाहेब वाघमोडे, पाटीलबा बाचकर आदिनाथ विटनोर, आप्पासाहेब विटनोर, आंबादास विटनोर,अमोल विटनोर,दिलीप घोलप,अण्णासाहेब जुंधारे,अण्णासाहेब बिडगर,सुभाष विटनोर, हनुमंत भगत,आनंद विटनोर आदीं सह मान्यवर उपस्थित होते.

ऐन दुष्काळात मुळाधरणाच्या पाण्यातून मुळानदीवरील चारहि बंधारे पुर्ण क्षमतेने भरले असल्यामुळे शेतकऱ्यांन मध्ये आनंदी वातावरण असून सलग १२ वर्षापासून बंधारे भरण्याची प्रकिया राबविण्यात येत असून हक्काचे कायमस्वरूपी पाणी बंधारे भरण्यासाठी आरक्षीत करण्यासाठी निर्णायक लढाई राबविण्यात येणार असल्याचे कृती समितीचे अध्यक्ष दत्तात्रय घोलप, उपाध्यक्ष भाऊसाहेब विटनोर, विलास सैंदोरे, किरण जाधव यांनी सांगितले.

## माजी खा. प्रसाद तनपुरे यांच्या दूरदृष्टीतून उभारलेले

### आठ बंधारे दुष्काळातील जलसंजीवनी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :**मुळा आणि प्रवरा नदीवर माजी खासदार प्रसाद तनपुरे यांच्या प्रयत्नातून उभारण्यात आलेल्या आठ बंधाऱ्यांमुळे राहुरी तालुक्याला दुष्काळात मोठी जलसंजीवनी मिळाल्याने माजी खासदार प्रसाद तनपुरे यांच्या दूरदृष्टी पणाचे कौतुक करण्यात येत आहे.

मुळा व प्रवरा नदीवर मानोरी, मांजरी, केसापूर, डिग्रस, वांजुळपोई, पाथरे (वांगी) व नगर तालुक्यातील नांदगाव या आठ ठिकाणी हे बंधारे बांधण्यात आले आहेत. एखाद्या वर्षी पाऊस कमी पडला तरी या बंधाऱ्यांमुळे राहुरी, नेवासा आणि श्रीरामपूर या तीन तालुक्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळतो.



माजी खासदार प्रसाद तनपरे

सन१९७२ च्या भीषण दुष्काळात पाखरेही तडफडून मेली होती. अशा परिस्थितीची पुनरावृत्ती होऊ नये, या दूरदृष्टीतून माजी खासदार प्रसाद तनपुरे यांनी सत्ता नसतानाही या बंधाऱ्यांची निर्मिती केली होती

व त्या बंधार्यामध्ये मुळा धरणातून या पाणी सोडले जाते, त्यामुळे ते वर्षभर भरलेले राहतात. याचा थेट फायदा शेतीला, जनावरांना आणि ग्रामीण भागातील दुग्ध व्यवसायाला होत आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी, श्रीरामपूर आणि नेवासा तालुक्यासाठी हे आठ बंधारे वरदान ठरले असून माजी खासदार प्रसाद तनपुरे यांचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे. त्यांच्या या दूरदृष्टी संकल्पनाचे सर्वत्र कौतुक करण्यात येत असून शेतकरी व नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे.



## वारी-बाबतरा रस्त्याचा वनवास संपणार ; दुरुस्तीसाठी ४ कोटी : आ. काळे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी :** कोपरगाव तालुक्याच्या पूर्व भागातील दळणवळणाच्या दृष्टीने महत्त्वाचा असलेल्या वारी-बाबतरा (प्रजिमा-२०३) या रस्त्याच्या सुधारणा कामासाठी महायुती शासनाने ०४ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. वारीसह पंचक्रोशीतील नागरिकांच्या अडचणी लक्षात घेऊन आमदार आशुतोष काळे यांनी शासन दरबारी सादर केलेल्या प्रस्तावाचा सातत्याने पाठपुरावा केला. या पाठपुराव्याला यश मिळाले असून, सुमारे तीन किलोमीटर लांबीच्या या रस्त्याच्या दुरुस्तीचा मार्ग मोकळा झाला आहे. कोपरगाव मतदारसंघातील रस्ते विकासाचा अनुशेष भरून काढण्यासाठी आमदार आशुतोष काळे यांच्या प्रयत्नांतून कोट्यावधी रुपयांचा निधी उपलब्ध झाला आहे. या निधीतून मतदार संघातील विविध रस्ते व पुलांची कामे पूर्ण झाली असून, काही कामे प्रगतिपथावर आहेत. तर काही कामांना लवकरच सुरुवात होणार आहे. वारी गावाच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरलेल्या गोदावरी नदीवरील पुलाच्या कामासाठीही आमदार आशुतोष काळे यांनी २० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला होता. अनेक वर्षांपासून वारीसह पंचक्रोशीतील नागरिकांची मागणी असलेल्या या पुलाचे काम पूर्ण होऊन काही महिन्यांपूर्वीच तो वाहतुकीसाठी खुला झाला आहे. त्यामुळे वारी परिसरातील दळणवळणाला मोठी चालना मिळाली आहे. दरम्यान, मतदार संघातील खराब रस्त्यांमुळे नागरिकांना होणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी आमदार आशुतोष काळे यांनी संबंधित रस्त्यांचे प्रस्ताव तयार करून शासनाकडे निधीसाठी पाठपुरावा सुरू ठेवला आहे. त्यातूनच वारी-बाबतरा रस्ता (प्रजिमा-२०३) या रस्त्याच्या सुधारणा कामासाठी चार कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. या निधीमुळे अनेक वर्षांपासून रखडलेल्या रस्त्याच्या दुरुस्तीचा प्रश्न मार्गी लागणार असून, वारीसह पंचक्रोशीतील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. निधी मंजूर झाल्याबद्दल वारी ग्रामस्थांनी आमदार आशुतोष काळे यांचे आभार मानले.

## खांडगावला तरुणांनी राबविले स्वच्छता अभियान

### महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंतीनिमित्त उपक्रम

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर :** राष्ट्रपिता महात्मा गांधी व माजी पंतप्रधान भारतरत्न लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त खांडगाव येथे गावातील तरुण, ग्रामस्थ तसेच महायुतीच्या कार्यकर्त्यांनी हातात झाडू घेऊन गावातील स्मशानभूमी, जिल्हा परिषद शाळा, छत्रपती शिवाजी महाराज चौक तसेच समाजमंदिर परिसरासह विविध सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता करून स्वच्छता अभियान राबवले

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी स्वच्छ, निरोगी आणि सुंदर भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी या देशातील प्रत्येक नागरिकाने स्वच्छतेची जबाबदारी स्वीकारणे आवश्यक आहे. याच विचाराला पुढे नेत खांडगावमध्ये स्वच्छता अभियान राबविण्यात आले या अभियानाच्या माध्यमातून 'स्वच्छता ही केवळ एका दिवसाची मोहीम नसून ती प्रत्येक नागरिकाच्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग असावी', असा संदेश तरुणांनी या अभियानाच्या माध्यमातून दिला . सार्वजनिक परिसर स्वच्छ ठेवण्याबरोबरच गावातील नागरिकांनी स्वच्छतेबाबत जागरूक राहावे, असे आवाहनही यावेळी करण्यात आले.



विशेष म्हणजे, या अभियानाचा समारोप गावातील स्मशानभूमीमध्ये अल्पोपहाराने करण्यात आला. स्वच्छतेसोबतच सामाजिक एकोपा, श्रमदान व सामूहिक जबाबदारीची भावना जोपासणारा हा उपक्रम ग्रामस्थांमध्ये चर्चेचा विषय ठरला. स्वच्छता, सामाजिक बांधिलकी व गावाच्या विकासासाठी एकत्रित पणे काम करण्याचा सकारात्मक संदेश या अभियानाच्या माध्यमातून तरुणांनी दिला

## पतीसोबतच्या वादाचा जाब विचारताना महिलेला मारहाण; तिघांविरुद्ध गुन्हा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** पतीसोबत झालेल्या वादाचा जाब विचारण्यासाठी गेलेल्या महिलेला लाकडी दांड्याने मारहाण करून तिचा विनयभंग केल्याची घटना राहुरी तालुक्यातील ब्राम्हणी येथे ३० सप्टेंबर रोजी सायंकाळी साडेचारच्या सुमारास घडली. याप्रकरणी महिलेच्या फिर्यादीवरून तिघांविरुद्ध राहुरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी महिला घरासमोर असताना अक्षय कैलास मोकाटे हा दारूच्या नशेत हातात लाकडी दांडा घेऊन तेथे आला. 'तुझा नवरा कुठे आहे? माझ्यासोबत वाद घालतो काय?' असे म्हणत त्याने महिलेला शिवीगाळ केली. त्यानंतर तिच्या डाव्या मांडीवर लाकडी दांड्याने मारहाण केली. तसेच साडीचा पदर ओढून लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केल्याचे फिर्यादीत नमूद आहे. दरम्यान, आरोपीने महिलेच्या हातातील मोबाईल हिसकावून तो फेकून दिल्याने त्याचे नुकसान झाले. आईला मारहाण होत असल्याचे पाहून तिची दोन्ही मुले भांडण सोडविण्यासाठी आली असता दत्तू शंकर मोकाटे आणि सागर दत्तू मोकाटे यांनी त्यांनाही शिवीगाळ करून दमदाटी केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. याप्रकरणी अक्षय कैलास मोकाटे, दत्तू शंकर मोकाटे आणि सागर दत्तू मोकाटे (तिघेही रा. ब्राम्हणी, ता. राहुरी) यांच्याविरुद्ध गुन्हा रजिस्टर क्रमांक ११३४/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेच्या कलम ७४, ११८(१), ३५२, ३५१(२), ३२४(२) व ३(५) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस निरीक्षक रवींद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस अंमलदार अशोक कुदळे करीत आहेत.

## गांधीजींचे विचार विद्यार्थ्यांनी आत्मसात करणे गरजेचे : जयराज दंडवते

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी (प्रतिनिधी) :** राहाता तालुक्यातील साकुरी येथील अशोकराव दामोधर दंडवते पाटील ग्रामीण शैक्षणिक प्रतिष्ठान संचलित द्रोणा स्कूल व कॉलेजमध्ये राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.



कार्यक्रमाची सुरुवात द्रोणा अकॅडमीचे अध्यक्ष जयराज दंडवते यांच्या हस्ते महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी शिक्षक व विद्यार्थ्यांनीही अभिवादन केले. जयराज दंडवते म्हणाले की, महात्मा गांधीजींचे सत्य, अहिंसा, स्वच्छता आणि साधेपणाचे विचार आजच्या पिढीने आत्मसात करणे गरजेचे आहे. केवळ जयंती साजरी न करता हे विचार प्रत्यक्ष आचरणात आणणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल.

यावेळी विद्यार्थ्यांनी गांधीजींच्या सत्य, अहिंसा व स्वच्छतेच्या विचारांसह लालबहादूर शास्त्री यांच्या देशभक्ती, प्रामाणिकपणा आणि 'जय जवान, जय किसान' या घोषणेवर भाषणे केली. तसेच परिसर स्वच्छ ठेवण्याचा संदेश देत देशसेवा, कर्तव्यनिष्ठा व सामाजिक बांधिलकीचे महत्त्व सांगितले.

यावेळी संचालिका प्राजक्ताताई दंडवते, उपाध्यक्ष अनुप दंडवते, प्राचार्या अनिता रोहोम यांच्यासह शिक्षक, शिक्षिका व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आदिवासी बांधवांसाठी राहाता येथे शासकीय योजना मार्गदर्शन शिबिर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी** :राहाता येथे आदिवासी आयुक्त कार्यालय नाशिक विभाग महाराष्ट्र शासन व आदिवासी प्रकल्प कार्यालय राजूर यांचेमार्फत सर्व आदिवासी समाज बांधवांसाठी विविध शासकीय योजनांची माहिती व त्यांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक असलेल्या कागदपत्रांबाबत विशेष मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

हे शिबिर शनिवार दिनांक ०३ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी १० वाजता घोलप मंगल कार्यालय चितळी रोड राहाता येथे होणार असून या शिबिरात शासनाच्या वतीने आदिवासी समाजासाठी राबविण्यात येणाऱ्या शिक्षण आरोग्य रोजगार गृहनिर्माण शेती वनहक्क तसेच महिला व युवकांच्या विकासासाठीच्या योजनांची सविस्तर माहिती अधिकाऱ्यांकडून दिली जाणार आहे. योजनांसाठी पात्रता अटी अर्ज करण्याची पद्धत आणि आवश्यक कागदपत्रे याबाबत प्रत्यक्ष मार्गदर्शन केले जाणार आहे. त्यामुळे माहिती अभावी लाभापासून वंचित राहणाऱ्या अनेक कुटुंबांना याचा मोठा फायदा होणार आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवाजीराव गांगुर्डे राज्य अध्यक्ष असून प्रमुख मान्यवर म्हणून राज्य जिल्हा व शहर पातळीवरील अनेक पदाधिकारी आणि महिला शक्तीच्या प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. तरी आयोजकांनी या शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.



हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

# शेतकऱ्यांच्या मदतीसाठी शासन सज्ज : ना. विखे पाटील



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कोळपेवाडी** : राज्य शासनाने जाहीर केलेल्या कर्जमाफीमुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळाला असून, दुष्काळी परिस्थितीतही शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार दुष्काळग्रस्त तालुक्यांमध्ये पिकांच्या पंचनाम्यांना वेग देण्यात आला असून, त्याआधारे जास्तीत जास्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत दिली जाईल, अशी ग्वाही राज्याचे जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.

कोपरगाव तालुक्यातील टंचाई परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली व आमदार आशुतोष काळे यांच्या उपस्थितीत शनिवारी (दि. ३) कृष्णाई मंगल कार्यालयात बैठक झाली. यावेळी वीज, पाणी, सिंचन, पिण्याचे पाणी आणि वन्यप्राण्यांच्या उपद्रवाचा आढावा घेण्यात आला.

तालुक्यातील विजेची समस्या सोडविण्यासाठी रोहित्रांची क्षमता वाढविण्यात येणार आहे. २५ केव्हीएचे रोहित्र ६३ केव्हीए, तर ६३ केव्हीएच्या ठिकाणी १०० केव्हीए क्षमतेची नवीन रोहित्रे बसविण्याची कार्यवाही महिनाभरात करण्यात येणार असल्याचे विखे पाटील यांनी सांगितले. रखडलेल्या पाणीपुरवठा योजनांची कामे तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश देतानाच रब्बी हंगामासाठी डिसेंबर व फेब्रुवारीमध्ये कालव्यांना आवर्तन सोडण्याचा निर्णय झाल्याचे त्यांनी सांगितले. जुनी पाणीपट्टी थकीत असलेल्या शेतकऱ्यांनी केवळ चालू वर्षाची पाणीपट्टी भरावी.

जुन्या थकबाकीच्या कारणावरून शेतकऱ्यांची अडवणूक करू नये, असे निर्देश त्यांनी दिले. बिबट्यांचा वाढता वावर लक्षात घेता आवश्यक ठिकाणी पिंजरे लावण्याचे आदेशही वन विभागाला देण्यात आले.

### नगरपरिषदेची ११ कोटींची थकबाकी; दंड माफ करण्यास सकारात्मक

कोपरगाव नगरपरिषदेची जलसंपदा विभागाकडे सुमारे ११ कोटी रुपयांची थकबाकी आहे. त्यातील मूळ पाणीपट्टी सुमारे २.५ कोटी रुपये असून, कर व दंडामुळे थकबाकी वाढली आहे. दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता दंडाची रक्कम माफ करून नगरपरिषदेने केवळ मूळ थकबाकी भरावी, अशी मागणी आमदार आशुतोष काळे यांनी केली. यावर विखे पाटील यांनी दंड माफ करून २.५ कोटी रुपये भरण्यास हिरवा कंदील दाखविला असून, उर्वरित रक्कम माफ करण्याबाबत सकारात्मक प्रतिसाद दिला.

## जिल्हा बँकेच्या निवडणुकीत सचिन देसरडा यांचा उमेदवारी अर्ज दाखल



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीसाठी बिगरशेती संस्था मतदारसंघातून भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष सचिन देसरडा यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला.

यावेळी नेवासा विधानसभा मतदारसंघाचे आमदार विठ्ठलराव लंघे, महायुतीचे विविध पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच देसरडा यांचा मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता. अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीची प्रक्रिया सुरू झाली असून विविध मतदारसंघांतून इच्छुक उमेदवारांकडून उमेदवारी अर्ज दाखल केले जात आहेत. त्याच पार्श्वभूमीवर बिगरशेती संस्था मतदारसंघातून सचिन देसरडा यांनी समर्थकांच्या उपस्थितीत आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.

यावेळी आमदार विठ्ठलराव लंघे यांच्यासह महायुतीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी देसरडा यांना शुभेच्छा दिल्या. सहकार क्षेत्राशी संबंधित या निवडणुकीकडे जिल्ह्यातील राजकीय व सहकारी क्षेत्राचे लक्ष लागले आहे. उमेदवारी अर्ज दाखल करताना महायुतीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांची उपस्थिती लक्षवेधी ठरली. उमेदवारी अर्ज दाखल करताना महायुतीचे पदाधिकारी, भाजपाचे कार्यकर्ते, सहकार क्षेत्रातील प्रतिनिधी तसेच मित्रपरिवार उपस्थित होता.

## द•ख•ल

### डॉ. अर्पिता ताकेचे बीएचएमएस परीक्षेत प्रथम श्रेणीत सुयश



**शिरसगाव** : श्रीरामपूर तालुक्यातील उंदीरगाव येथील अनिल ताके यांची सुकन्या अर्पिता ताके ही के बी आबड होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज चांदवड नासिक येथे बी एच एम एस परीक्षामध्ये प्रथम श्रेणीने उत्तीर्ण झाली व डॉक्टर होण्याची संधी मिळाली या यशाबद्दल तिच्या आई-वडिलांचे मोलाचे मार्गदर्शन झाले तिच्या या यशाबद्दल माजी चेअरमन सुरेश पाटील गलांडे संचालक राजेंद्र पाटील पाऊलबुद्धे, संचालक वीरेश गलांडे ,राजेंद्र नाईक रामचंद्र आव्हाड व ताके परिवाराकडून अभिनंदन करण्यात आले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

### ‘संजीवनी’च्या सुमित व निकिता कोल्हे यांची प्रवरा एक्स्पोला भेट




**झरेकाठी** : संजीवनी उद्योग समूहाचे विश्वस्त सुमित कोल्हे व निकिता कोल्हे यांनी लोणी येथे सुरू असलेल्या ‘बिल्डिंग प्रवरा विद्यार्थी एक्स्पो’ला भेट देत विद्यार्थ्यांच्या विविध उपक्रमांची माहिती घेतली. शिक्षणासोबत विद्यार्थ्यांना आत्मनिर्भर व उद्योजक बनविण्याच्या दिशेने प्रवरा संस्थेचे प्रयत्न कौतुकास्पद असून, शिक्षणासाठी अहिल्यानगरचे नवे मॉडेल उभारण्यासाठी एकत्रितपणे काम करण्याचा आशावाद त्यांनी व्यक्त केला. संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम सुरू आहे. ‘स्थानिक ते जागतिक’, ‘टाकाऊपासून टिकाऊ’, स्वदेशी वस्तूंचा वापर, पर्यावरण संवर्धन, प्लास्टिकमुक्ती, पारंपरिक ऊर्जा व आयुर्वेद अशा विविध विषयांवर विद्यार्थ्यांनी आकर्षक स्टॉल उभारले आहेत. विद्यार्थी स्वतः व्यवसायाची निवड करून उत्पादन निर्मिती, किंमत ठरविणे, ग्राहकांशी संवाद, विपणन व प्रत्यक्ष विक्रीचा अनुभव घेत आहेत. त्यामुळे ग्रामीण विद्यार्थ्यांमधील कल्पकता आणि उद्योजकतेला व्यासपीठ मिळत आहे.

### लांघे परिवाराकडून शाळेला कलर प्रिंटर भेट




**बालाजी देडगाव** : नेवासा तालुक्यातील बालाजी देडगाव येथील लांघे परिवाराकडून मातोश्री कै. भामाबाई भानुदास लांघे यांचे प्रथम पुण्यस्मरणानिमित्त जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हनुमाननगर (तेलकुडगाव, ता. नेवासा)या शाळेस २१ हजार रुपये किंमतीचे कॅनन कंपनीचे कलर प्रिंटर भेट देण्यात आले.

यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष लक्ष्मण आबासाहेब काळे, उपाध्यक्ष शंकरराव गायकवाड व सदस्य शाळा व्यवस्थापन समिती मुख्याध्यापक, उपस्थित पालक बंडू काळे, दीपक घाडगे, राजेंद्र गटकळ, शिक्षक वृंद यांनी ही भेट स्वीकारली. रामायणाचार्य हनुमंतजी महाराज वैष्णव सेवा आश्रम बऱ्हाणपूर यांचे हस्ते ही भेट देण्यात आली. शाळेच्या वतीने मातोश्री कै. भामाबाई भानुदास लांघे यांना भावपूर्ण आदरांजली अर्पण करण्यात आली. लांघे परिवाराने शाळेस दिलेल्या अनमोल देणगी बद्दल शाळेच्या वतीने आभार व्यक्त करण्यात आले.

## सातारा जिल्ह्यातील शेतकऱ्यांची कृषी विद्यापीठातील विविध प्रकल्पांना भेट




प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील दहा जिल्ह्यांत ‘सेवा संकल्प अभियान’ राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा), सातारा आणि गोकाक सहकारी पाणीपुरवठा संस्था, मलकापूर, कराड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यांतर्गत शेतकरी अभ्यासदौऱ्यात १०० सभासद शेतकरी व कृषी अधिकाऱ्यांनी कृषी विद्यापीठातील विविध संशोधन प्रकल्पांना भेट दिली.

मलकापूरचे उपनगराध्यक्ष तथा गोकाक सहकारी पाणीपुरवठा संस्थेचे अध्यक्ष मनोहर शिंदे यांच्या उपस्थितीत झालेल्या या दौऱ्यात कृषी तंत्रज्ञान माहिती केंद्रात जनसंपर्क अधिकारी डॉ. सचिन सदाफळ यांनी विद्यापीठाच्या शिक्षण, संशोधन व विस्तार कार्याची माहिती दिली.

आंतरविद्याशाखा जलसिंचन व्यवस्थापन विभागात विभागप्रमुख डॉ. विजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. देविदास खेडकर यांनी सूक्ष्म सिंचनाद्वारे पाण्याचा कार्यक्षम वापर करण्याबाबत मार्गदर्शन केले. सौरऊर्जेवर चालणाऱ्या सेंटर पिव्होट सिंचन प्रणालीचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिकही दाखविण्यात आले.

मृदाशास्त्रज्ञ डॉ. सुभाष घोडके यांनी मर्यादित पाण्यात जमिनीचे आरोग्य टिकविण्याबाबत, तर डॉ. आनंद जाधव यांनी माती व पाणी परीक्षण तसेच रब्बी पिकांच्या खत व्यवस्थापनाबाबत मार्गदर्शन केले. उद्यानविद्या विभागप्रमुख डॉ. भरत पाटील यांनी भाजीपाला पिकांवरील संशोधनाची माहिती दिली.

सेंद्रिय शेती प्रकल्पात वरिष्ठ संशोधन सहयोगी विक्रम उगले यांनी विविध प्रयोगांची माहिती दिली. विद्यापीठातील शेतकरीभिमुख संशोधनाचे मनोहर शिंदे यांनी कौतुक केले. दौऱ्याचे नियोजन डॉ. सचिन सदाफळ यांनी केले.

## विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला व पाककौशल्याला वाव देणे हेच ध्येय : दंडवते



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी** : विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला आणि पाककौशल्याला वाव देण्यासाठी द्रोणा अकॅडमीच्या वतीने फायरलेस कुकिंग स्पर्धे चे आयोजन करण्यात आले होते. अग्नीचा वापर न करता स्वादिष्ट, आकर्षक आणि पौष्टिक पदार्थ तयार करण्याची संधी या स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मिळाली. स्पर्धेत विद्यार्थ्यांनी फळे, भाज्या, ब्रेड, दुग्धजन्य पदार्थ आदींचा कल्पकतेने वापर करून नाविन्यपूर्ण पाककृती सादर केल्या. पदार्थांची आकर्षक मांडणी, स्वच्छता, चव, पौष्टिकता आणि सादरीकरणातील नावीन्य या निकषांवर परीक्षकांनी मूल्यमापन केले.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये स्वावलंबन, सर्जनशीलता, टीमवर्क आणि स्वच्छतेच्या सवयी विकसित होण्यास मदत झाली. तसेच आरोग्यदायी आहाराचे महत्त्वही विद्यार्थ्यांना समजले. स्पर्धेदरम्यान विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने आपल्या पदार्थांची माहिती, त्यातील घटक आणि पौष्टिक मूल्य परीक्षकांसमोर मांडले. केवळ पाककलाच नव्हे, तर नियोजन, वेळेचे व्यवस्थापन आणि आकर्षक सादरीकरणाचे महत्त्वही या स्पर्धेतून विद्यार्थ्यांना उमगले. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे संपूर्ण परिसर आनंदी आणि उत्साहपूर्ण वातावरणाने भारून गेला होता. यावेळी बोलताना संस्थेच्या संचालिका प्राजक्ताताई दंडवते यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला, कल्पकतेला आणि पाककौशल्याला प्राधान्याने वाव देण्याचे कार्य अशा स्पर्धांमधून होत असते. अशा विविध उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळते आणि त्यांच्या सुप्त गुणांना योग्य व्यासपीठ मिळते, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

या स्पर्धेसाठी प्रशिक्षक म्हणून मसूद फातिमा शेफुद्दीन शेख, मुक्ता संतोष भरड, प्रियंका सचिन तट आणि नेहा प्रसाद गिरगावकर या महिला प्रशिक्षकांनी विद्यार्थ्यांशी उत्तम संवाद साधत योग्य मार्गदर्शन केले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांना पदार्थ तयार करताना नवनवीन कल्पना सुचल्या आणि सादरीकरण अधिक आकर्षक झाले. स्पर्धेच्या समारोपप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष जयराज दंडवते, संचालिका प्राजक्ताताई दंडवते, उपाध्यक्ष अनुप दंडवते, प्राचार्या अनिता रोहोम यांच्यासह शिक्षक-शिक्षिकांनी सर्व स्पर्धक विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आणि त्यांच्या कल्पकतेचे कौतुक केले.

## दुष्काळी परिस्थितीत सौर कृषी पंपाचे विविध फायदे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : तालुक्यातील गोदाकाठच्या वाशिम या गावचे प्रगतशील शेतकरी शिवाजीराव सोनवणे यांनी दुष्काळी परिस्थितीत सौर कृषी पंपाचे विविध फायदे विशद केले.

त्यांच्या शेतावर कृषी शास्त्रज्ञ डॉक्टर अशोकराव ढगे कृषी अधिकारी लक्ष्मणराव सुडके यांनी भेट देऊन पाहणी केली. श्री सोनवणे म्हणाले की रात्री पिकांना पाणी पाजण्यासाठी शेतावर जाण्याची गरज भासत नाही. गोदाकाठ परिसरात बिबट्यांचा व जंगली डुकरांचा तसेच विषारी सापांचा सुळसुळाट आहे त्यामुळे रात्रीच्या वेळी पिकांना पाणी देण्यासाठी खूप त्रास होत होता आता तो त्रास होत नाही.

त्याचप्रमाणे वीस पुरवठा सारखा खंडित झाल्यामुळे शेतात जाणे व वारंवार इलेक्ट्रिक मोटर सुरू करणे यामुळे कष्ट व त्रास होत होता तोही आता बंद झाला आहे. पिकांना संवेदनक्षम अवस्थेत पाणी मिळाले नाही तर उत्पादनात खूप घट होते त्यामुळे आता पिकांच्या संवेदनशील अवस्थेत योग्य प्रमाणात पाणी दिले जाते त्याचा परिणाम शेतमालाच्या उत्पादनात भरीव वाढ झाल्याचे आढळून आले आहे.



भारत सरकार सौर ऊर्जा कृषी पंपाला भरीव अनुदान देत असल्याबद्दल श्री शिवाजीराव सोनवणे यांनी सरकारचे मनापासून आभार मानले आहेत. गोदाकाठ च्या शेतकऱ्यांनी शिवाजीराव सोनवणे या प्रगतशील शेतकऱ्यांच्या शेताला भेट देऊन वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी अवश्य सल्ला घ्यावा असे स्पष्ट प्रतिपादन कृषी शास्त्रज्ञ डॉक्टर अशोकराव ढगे यांनी केले आहे. मंडल कृषी अधिकारी लक्ष्मणराव सुडके यांनी स्पष्ट केले की शेतकऱ्यांच्या अडचणीवर मार्ग काढण्यासाठी कृषी खाते सतत प्रयत्नशील आहे याप्रसंगी वाशिम परिसरातील शेतकरी उपस्थित होते.

## जलजीवन मिशनची विहीर पाण्याने तुडुंब; तरीही माळवाडगांव तहानलेलेच!



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**माळवाडगाव** : श्रीरामपूर तालुक्यातील माळवाडगाव येथे ऑक्टोबरच्या सुरुवातीलाच पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला असून, गावाला सध्या दोन दिवसांच्या अंतराने पाणीपुरवठा करण्याची वेळ आली आहे. ग्रामपंचायतीच्या जुन्या पाणीपुरवठा विहिरीची पाणीपातळी झपाट्याने खालावत असताना, दुसरीकडे जलजीवन मिशनअंतर्गत मुठेवाडगाव परिसरातील विहिरीत मुबलक पाणी उपलब्ध असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

त्यामुळे उपलब्ध पाणीस्रोताचा वापर करून जलजीवन मिशनची योजना तातडीने कार्यान्वित करून ग्रामपंचायतीच्या ताब्यात देण्याची मागणी होत आहे.

ग्रामपंचायतीच्या जुन्या विहिरीतील पाणीसाठा कमी झाल्याने पूर्वी एक दिवसाआड होणारा पाणीपुरवठा आता दोन दिवसांच्या अंतराने करावा लागत आहे. आगामी काळातील संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेता प्रशासनाने आतापासूनच उपाययोजना करण्याची गरज आहे. जलजीवन मिशनच्या विहिरीपासून माळवाडगावपर्यंत पाईपलाईन करण्यात आली असून, तिची चाचणीही घेण्यात आल्याची माहिती आहे. त्यामुळे पाणीस्रोत आणि पाणी वाहून नेण्याची यंत्रणा उपलब्ध असताना केवळ आवश्यक तांत्रिक व प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करून योजना सुरू करण्याची गरज आहे.

योजनेची प्रत्यक्ष पाहणी करून पाण्याची उपलब्धता, पाईपलाईनची स्थिती, पाणीपुरवठ्याची क्षमता आणि अन्य तांत्रिक बाबी तपासाव्यात. आवश्यक चाचण्या पूर्ण करून योजना ग्रामपंचायतीच्या ताब्यात देण्यात यावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

या योजनेचे भूमिपूजन तत्कालीन महसूल मंत्री तथा तत्कालीन पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते झाले होते. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. राजेंद्र भोसले व जिल्हा पोलिस अधीक्षक राकेश ओला उपस्थित होते.

### पाणी आहे, पाईपलाईनही; मग प्रतीक्षा कशासाठी?

पाणी उपलब्ध आहे, पाईपलाईन उपलब्ध आहे आणि तिची चाचणीही झाल्याची माहिती आहे. मग गावाला नियमित पाणीपुरवठा सुरू करण्यासाठी आणखी किती प्रतीक्षा करावी लागणार, असा सवाल ग्रामस्थांमधून उपस्थित होत आहे. जलजीवन मिशनच्या योजनेची तांत्रिक तपासणी करून आवश्यक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर ती तातडीने ग्रामपंचायतीच्या ताब्यात देऊन पाणीपुरवठा सुरू करावा, अशी मागणी आहे.

### तांत्रिक चाचणीनंतर योजना ताब्यात घ्यावी

‘ माळवाडगावला भविष्यात पाणीटंचाईचा सामना करावा लागू नये, यासाठी आवश्यक उपाययोजना करणे गरजेचे आहे. सातवडी येथील विहिरीची खालावलेली पाणीपातळी लक्षात घेता, जलजीवन मिशनअंतर्गत मुठेवाडगाव येथील पाणीपुरवठा योजना ग्रामपंचायतीने ताब्यात घेण्यास आमची हरकत नाही. मात्र संबंधित अभियंत्यांमार्फत योजनेची रीतसर तांत्रिक चाचणी करून आवश्यक ‘६५ नंबर’ व एम.बी. रेकॉर्डची पूर्तता करावी. त्यानंतर योजना ग्रामपंचायतीच्या ताब्यात घेऊन पाणीपुरवठा सुरळीत करावा.

**सुरेश आसने, ग्रामपंचायत सदस्य**

‘ जलजीवन मिशनचे काम पूर्ण झाल्यानंतर सुमारे तीन महिने याच विहिरीतून गावाला पाणीपुरवठा करण्यात आला. त्यानंतर ग्रामपंचायतीत सत्तांतर झाल्यापासून ही योजना बंद आहे. ३० मे २०२६ रोजी झालेल्या ग्रामसभेत योजना ग्रामपंचायतीच्या ताब्यात घेण्याबाबत चर्चा झाली होती. मात्र अद्याप योजना ताब्यात न घेतल्याने उपलब्ध पाणीस्रोत असूनही नागरिकांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे.

**नानासाहेब आसने, ग्रामपंचायत सदस्य**

### ग्रामपंचायतीचा पाठपुरावा सुरू

‘ गावातील नागरिकांना नियमित व पुरेसा पिण्याच्या पाण्याचा पुरवठा व्हावा, यासाठी ग्रामपंचायतीच्या स्तरावर आवश्यक उपाययोजना व पाठपुरावा सुरू आहे. जलजीवन मिशनच्या योजनेबाबत आवश्यक तांत्रिक व प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करून उपलब्ध पाणीस्रोताचा योग्य उपयोग करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

**ग्रामपंचायत अधिकारी, माळवाडगाव**

## पत्रकारांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी ‘पत्रकारांची बँक’

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**प्रवरानगर** : पत्रकारांच्या आर्थिक सक्षमीकरणाच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल टाकत राज्य मराठी पत्रकार परिषद, महाराष्ट्र प्रदेश यांच्या पुढाकारातून ‘पत्रकार नागरिक सहकारी मल्टीस्टेट बँके’ची मुहूर्तमेढ रोवण्यात आली. पत्रकारांच्या आर्थिक गरजा लक्षात घेऊन उभारण्यात येणाऱ्या या बँकेच्या माध्यमातून आर्थिक स्थैर्य, बचत, कर्ज व भविष्यातील सुरक्षिततेसाठी विविध सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

बँकेच्या माध्यमातून पत्रकारांना कमी व्याजदरात कर्ज, विमा सुविधा, बचत योजना तसेच आपत्कालीन आर्थिक मदत उपलब्ध करून देण्याचे नियोजन आहे. विशेषतः ग्रामीण व तालुका पातळीवर काम करणाऱ्या पत्रकारांना या उपक्रमाचा लाभ मिळणार असल्याचे परिषदेकडून सांगण्यात आले. मराठवाड्यात सुरू झालेल्या सभासद नोंदणी मोहिमेला पत्रकारांचा प्रतिसाद मिळत असून, आगामी काळात महाराष्ट्रासह देशातील अन्य राज्यांतही बँकेचा विस्तार करण्याचा मानस व्यक्त करण्यात आला.

राज्य मराठी पत्रकार परिषदेचे केंद्रीय अध्यक्ष मधुसूदन कुलथे म्हणाले, लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून काम करणाऱ्या पत्रकारांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याच्या उद्देशाने ही बँक उभारण्यात येत आहे. ग्रामीण भागापासून जागतिक स्तरावर काम करणाऱ्या पत्रकारांना आर्थिक स्थैर्य मिळवून देण्यासाठी बँक महत्त्वाची भूमिका बजावेल. अहिल्यानगर जिल्ह्यातही या बँकेची शाखा लवकरच सुरू करण्यात येणार असल्याचे जिल्हाध्यक्ष शहाजी दिघे यांनी सांगितले.

यावेळी राजकुमार बिर्ला, डॉ. अनिल सिरसाट, संदीप महाजन, प्रवीण शिंदे, डॉ. बालाजी पेनूरकर, शुद्धोधन हनवते, प्रदीपकुमार जैन, देवांद गुंडेकर, सदाशिव पतंगे, सुनीता वेरूळकर, चंदा शर्मा, शुभम लोखंडे, रामराव रत्नपारखे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## पान १ वरुन

### नांदूर निंबादैत्यला लोकसहभागातून चारा डेपो

२० किलो चारा वाटप सुरू केले. एका शेतकऱ्याच्या दोन जनावरांना मोफत चारा दिला जातो. सध्या दोनशे लाभार्थी शेतकरी असून गावातील चारशे जनावरांना दररोज ताजा, हिरवागार, चारा खायला मिळतो. कार्यकर्त्यांची अशी नि:स्वार्थ सेवा बघून काही व्यावसायिक , परिसरातील शेतकऱ्यांनी या सेवेत हातभार लावला. पाथर्डीच्या सुवर्ण युग तरुण मंडळाने गणेशोत्सवा दरम्यान एक दिवसाचा चारा मोफत दिला. सध्या तर मयाचे भाव सुद्धा साडेचार ते पाच हजार रुपये टनांवर जाऊन पोहोचले आहे. तालुयाच्या काही ग्रामीण भागात तर पाणीटंचाईने दैनंदिन जीवन चक्र बदलले आहे. तीव्र उन्हामुळे वातावरण सुद्धा अतिशय नकारात्मक व उदास वाणे बनले आहे. बाजारपेठेत ग्राहक नसल्याने बहुसंख्य व्यापारी तोट्यात चालले असून दैनंदिन खर्चात यात त्यांच्याकडून बचत सुरू झाली आहे. टंचाई ने त्रस्त जनता चिंता क्रांती झाली आहे.

सेवाभावी पद्धतीने लोकसहभागातून चालू असलेल्या चारा डेपोला मदत करावी, अशा प्रकारची चर्चा झाली. पालकमंत्र्यांनी याबाबत सर्वतोपरी सहकार्याचे आश्वासन दिले. ग्रामस्थांनी सुद्धा निंबादैत्य देवस्थान व चारा डेपोला भेट देण्याची विनंती पालकमंत्री राधाकृष्ण विखे व आमदार मोनिका राजळे यांना केली. दैनंदिन खर्चाचा मेळ बसवणे कसरतीचे ठरत असल्याने दानशूर व सक्षम लोकांनी चारा डेपोला चारा स्वरूपात रोख स्वरूपात मदत करण्याची विनंती करण्यात आली आहे. पशुवैद्यकीय विभागा कडून पशु गणना सुरू आहे. गेल्या महिन्याभरात गावातील शेतकऱ्यांच्या ४०० जनावरांना लाभ मिळत असल्याने शेतकरी व कार्यकर्त्यांचे सुद्धा भावनिक नाते निर्माण झाले आहे.

### 'पुणे शिक्षक'वरून महायुतीतील संबंध ताणले!

केली आहे. शिवसेनेचा मतदार संघ भाजपच्या वाट्याला गेला आहे. परंतु आमची मागणी होती की पुणे पदवीधर मतदारसंघ भाजपला आणि शिक्षक मतदार संघ शिवसेनेला मिळावा. परंतु तसे झालेले नाही. शिक्षकांचा खूप मोठा आग्रह आहे, त्यांचे खूप मोठे समर्थन मला मिळत आहे.

### 'धर्म–जात नव्हे, शिक्षण–रस्ते–रोजगारासाठी मत द्या!'

करत त्यांनी 'फ्रेंड्स विथ बेनिफिट' असा टोला लगावला. उद्योग गुजरातला नेले जात असल्याचा आरोप करत महाराष्ट्रातील उद्योग आणि रोजगाराबाबतही त्यांनी सरकारला जाब विचारला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेले मूलभूत अधिकार संघर्षातून मिळाले आहेत; मात्र ते आयते मिळाल्याने त्यांच्या मूल्याची जाणीव कमी झाली आहे. नागरिकांनी आपल्या अधिकारांबाबत संवेदनशील होऊन प्रश्न विचारण्याची वेळ आली आहे, असे दिपके म्हणाले.

आयोगाच्या संपूर्ण शुद्धीकरणाची म्हणजेच वरपासून खालपर्यंत मागणी आहे, पण जे केंद्र सरकार शुद्ध आणि पवित्र पद्धतीनं निवडणुका घेऊ शकत नाही, ते स्पर्धा परीक्षा काय घेणार? असा हल्लाबोल त्यांनी केला. हे सरकार निवडणुकांमध्ये भ्रष्टाचार, घोटाळा आणि भेसळ करतंय, असा टोला त्यांनी लगावला.

### श्रीरामपूर गुन्हेगारीविरोधातील लढा थांबणार नाही

महंत रामगिरी महाराज, भास्करगिरी महाराज व आमदार विवेक कोल्हे यांच्यासह विविध स्तरांतून पाठिंबा मिळाला. गुन्हेगारांना जात–धर्म नसतो. श्रीरामपूर गुन्हेगारीमुक्त करण्यासाठी सर्वांनी एकत्र येणे गरजेचे आहे, असे ओगले व ससाणे यांनी सांगितले. मोक्का कारवाईनंतरही संघर्षाची धार कायम राहील, असे प्रकाश चित्ते यांनी स्पष्ट केले.

# त्रिमूर्ती संकुलात जिल्हास्तरीय रायफल शूटिंग, कुस्ती स्पर्धांना प्रारंभ

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** अहिल्यानगर जिल्हा क्रीडा व युवक सेवा संचालनालय, जिल्हा क्रीडा परिषद आणि त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठान संचलित श्री. दादासाहेब हरिभाऊ घाडगे पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, त्रिमूर्तीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने शालेय जिल्हास्तरीय रायफल शूटिंग व कुस्ती स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धांचे उद्घाटन नेवासा पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक प्रतापराव दराडे यांच्या हस्ते झाले.

या स्पर्धेत जिल्ह्यातील १४, १७ व १९ वर्षे वयोगटातील मुला–मुलींनी उत्स्फूर्त सहभाग





नोंदविला आहे. रायफल शूटिंगमध्ये एअर पिस्तूल, पीप साईट रायफल आणि ओपन साईट रायफल या तीन प्रकारांत खेळाडू कौशल्याची चुणूक दाखवत आहेत. कुस्तीमध्ये फ्रीस्टाइल व ग्रीको रोमन या प्रकारांत खेळाडू सहभागी झाले आहेत.

उद्घाटनप्रसंगी जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरांगे, त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठानच्या उपाध्यक्षा ॲड. सौ. स्नेहल चव्हाण–घाडगे पाटील, विश्वस्त चेतन चव्हाण पाटील, विद्यालयाचे प्राचार्य सोपानराव काळे, त्रिमूर्ती पब्लिक स्कूलच्या प्राचार्या दीपाली बाविस्कर, एन.डी.ए. विंगचे प्रमुख कर्नल के. पी. सिंग आदी उपस्थित होते.

उपस्थित मान्यवरांनी खेळाडूंशी संवाद साधत त्यांना शुभेच्छा दिल्या. शिस्त, एकाग्रता, सातत्य आणि मेहनत हीच क्रीडा क्षेत्रातील यशाची गुरुकिल्ली असल्याचे त्यांनी सांगितले. ग्रामीण व शालेय स्तरावरील खेळाडूंना रायफल शूटिंग व कुस्तीमध्ये आपले कौशल्य दाखविण्यासाठी अशा स्पर्धा महत्त्वपूर्ण असल्याचेही नमूद करण्यात आले. कुस्ती प्रशिक्षक तथा विद्यालयाचे क्रीडा समन्वयक संभाजी निकाळजे, रायफल शूटिंग प्रशिक्षक छबुराव काळे, महादेव काकडे, अभिजीत दळवी, तांत्रिक पंच सागर फाटके, केतन वाघ, रवींद्र कदम, दीपक रणपिसे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. अशोकराव गाडे यांनी केले, तर आभार अरविंद देशमुख यांनी मानले. स्पर्धेतून भविष्यातील राष्ट्रीय स्तरावरील नेमबाज व कुस्तीपटू घडतील, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

# इस्त्रो सहलीसाठी जिल्हा परिषदेच्या विद्यार्थ्यांची निवड परीक्षा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर (प्रतिनिधी) :** ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांची सवय लागावी आणि त्यांना विज्ञान–तंत्रज्ञानाची प्रेरणा मिळावी, या उद्देशाने जिल्हा परिषद अहिल्यानगरच्या वतीने इस्त्रो सहलीसाठी निवड परीक्षा घेण्यात आली. शहरातील डी. डी. काचोळे विद्यालयात झालेल्या या परीक्षेला तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमधील इयत्ता पाचवी ते सातवीच्या ३१८ विद्यार्थ्यांपैकी ३०९ विद्यार्थी उपस्थित होते.

जिल्हा परिषदेकडून मागील काही वर्षांपासून 'मिशन आरंभ'च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना विविध स्पर्धा परीक्षांसाठी तयार केले जात आहे. शिष्यवृत्ती, नवोदय व एनएमएमएस यांसारख्या परीक्षांसोबत इस्त्रो सहलीसाठी घेतली जाणारी निवड परीक्षा हा उपक्रमाचा महत्त्वाचा भाग आहे. विशेष म्हणजे या परीक्षेसाठी विद्यार्थ्यांकडून कोणतेही शुल्क आकारले जात नाही. जिल्हा परिषदेच्या शेष निधीतून परीक्षा व इस्त्रो सहलीचे आयोजन केले जाते.

राज्यसेवा परीक्षेच्या धर्तीवर परीक्षेचे नियोजन करण्यात आल्याने विद्यार्थ्यांना लहान वयातच स्पर्धा परीक्षेचा अनुभव मिळत आहे. मराठीसोबतच उर्दू माध्यमाच्या विद्यार्थ्यांनाही या परीक्षेत सहभागी करून घेण्यात आले असून, त्यांच्यासाठी उर्दू भाषेत स्वतंत्र प्रश्नपत्रिका उपलब्ध करून देण्यात आली.

जिल्हा शिक्षणाधिकारी भास्कर पाटील यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. आनंद भंडारी यांच्या मार्गदर्शनाखाली या उपक्रमाची अंमलबजावणी केली. शिक्षण विस्तार अधिकारी राजमोहम्मद शेख यांनी परीक्षा केंद्राला भेट दिली. गटशिक्षणाधिकारी दीपक त्रिभुवन यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षण विस्तार अधिकारी सुनील दरंदले, केंद्रप्रमुख शीतल गायकवाड, शकील बागवान, विषय शिक्षक गणेश बाचकर व पर्यवेक्षकांनी परीक्षा सुरळीत पार पाडली.

चौकट : **'मोठा अधिकारी होण्याचे स्वप्न पडू लागले'**

इयत्ता पाचवीची विद्यार्थिनी म्हणून परीक्षा देत असले तरी मोठा अधिकारी होण्यासाठीची परीक्षा देत असल्यासारखे वाटले. आता मोठा अधिकारी होण्याची स्वप्ने पडू लागली आहेत, अशी भावना एम. श्री. शाळा गोंडेगाव येथील विद्यार्थिनी अनुष्का सचिन गडाख हिने व्यक्त केली.

# उपचारादरम्यान गौतम उबाळेचा मृत्यू, आरोपींविरोधात खुनाचे कलम वाढविले

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर :** गंगापूर तालुक्यातील वरखेड येथे ग्रामपंचायत कार्यालयाच्या पाठीमागे झालेल्या वादातून लाकडी दांडा व काठीने केलेल्या मारहाणीत गंभीर जखमी झालेल्या गौतम लक्ष्मण उबाळे (वय ४२) यांचा उपचारादरम्यान शनिवारी (दि. ३) मृत्यू झाला. या घटनेनंतर शिल्लेगाव पोलिसांनी आरोपी अजय बाबासाहेब उबाळे (वय २२, रा. वरखेड) याच्याविरुद्ध दाखल गुन्ह्यात भारतीय न्याय संहितेच्या (बीएनएस) कलम १०३ (१) नुसार खुनाचे कलम वाढविले आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, १८ सप्टेंबर रोजी रात्री सुमारे ११.१५ वाजता गौतम उबाळे व अजय उबाळे हे ग्रामपंचायत कार्यालयाच्या पाठीमागे गप्पा मारत बसले होते. यावेळी दोघांमध्ये वाद झाला. त्याचे पर्यवसान मारहाणीत झाले. अजयने लाकडी दांडा व काठीने गौतम यांच्या डोक्यात व कपाळावर मारहाण केल्याची फिर्याद पोलिसांत दाखल झाली होती.

जखमी गौतम यांना प्रथम गंगापूर येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्रकृती गंभीर असल्याने त्यांना छत्रपती संभाजीनगर येथील घाटी रुग्णालयात हलविण्यात आले. उपचारानंतर २२ सप्टेंबर रोजी त्यांना घरी सोडण्यात आले. त्यानंतर २३ सप्टेंबर रोजी त्यांच्या फिर्यादीवरून शिल्लेगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. गंभीर दुखापत झाल्याचे वैद्यकीय प्रमाणपत्र मिळाल्यानंतर ३० सप्टेंबर रोजी बीएनएस कलम ११८ (२) वाढविण्यात आले. दरम्यान, प्रकृती पुन्हा खालावल्याने गौतम यांना २९ सप्टेंबर रोजी घाटी रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचार सुरू असतानाच त्यांचा मृत्यू झाला. आरोपी अजय उबाळे याला पोलिसांनी २ ऑक्टोबर रोजी रात्री अटक केली होती. पुढील तपास उपविभागीय पोलिस अधिकारी जान्हवी शेखर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक पाटील करीत आहेत.

# अस्लमने टाकळीभानचे नाव देशाच्या क्रीडा नकाशावर नेले : मयूर पटारे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान :** आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताच्या कबड्डी संघाचे प्रतिनिधित्व करत दुसऱ्यांदा सुवर्णपदक पटकावून टाकळीभानच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवणारे आंतरराष्ट्रीय कबड्डीपटू अस्लम इनामदार यांचा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या टाकळीभान उपबाजार आवाराच्या वतीने उत्साहात सत्कार करण्यात आला.

यावेळी बाजार समितीचे संचालक मयूर पटारे म्हणाले, अस्लम हा केवळ देशाचा खेळाडू नसून टाकळीभानच्या मातीतला मुलगा आणि आपला मित्र आहे. मेहनत, जिद्द व संघर्षाच्या जोरावर त्याने आंतरराष्ट्रीय स्तरावर यश मिळवून टाकळीभानचे नाव देशाच्या क्रीडा नकाशावर अभिमानाने पोहोचवले आहे. दोन वेळा आशियाई क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक मिळवणे ही संपूर्ण टाकळीभानसाठी अभिमानाची बाब आहे.




संचालक शिवाजी शिंदे यांनी अस्लमच्या यशाचे कौतुक करताना त्याच्या यशामागे आईचे संस्कार आणि त्याची जिद्द महत्त्वाची असल्याचे सांगितले. ग्रामीण भागातील युवकांनी मोठी स्वप्ने पाहून कठोर परिश्रम केल्यास आंतरराष्ट्रीय स्तरावर यश मिळवता येते, हे अस्लमने सिद्ध केले आहे, असेही त्यांनी नमूद केले.

माजी सरपंच भाऊसाहेब मगर यांनी ग्रामस्थांच्या वतीने अस्लमचे अभिनंदन करून भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी अशोक सहकारी साखर कारखान्याचे माजी अध्यक्ष ज्ञानदेव साळुंके, ज्येष्ठ पत्रकार चंद्रकांत लांडगे, दत्तात्रय नाईक, विलास दाभाडे यांच्या हस्ते अस्लमचा शाल, श्रीफळ व पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी ग्रामस्थ, पदाधिकारी, पत्रकार व क्रीडाप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## निधन

### मीरादेवी बंग



**श्रीरामपूर :** येथील माहेश्वरी समाजातील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते श्रीमती मीरादेवी रामदयाळजी बंग (वय–८६) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, तीन मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. भारत ऑटोमोबाईलचे मालक महेश बंग यांच्या मातोश्री, तर ऋषिकेश व व्यंकटेश बंग यांच्या आजी होत्या.

### अंशाबापू बनसोडे



**राहुरी:**खिर्डी ता. श्रीरामपूर येथील जुन्या पिढीतील अंशाबापू लिंबाजी बनसोडे यांचे वयाच्या १०२ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या मागे ३ मुले २ मुली सुना नातवंडे, ३भाऊ असा परिवार आहे. ते सुखदेव बनसोडे यांचे वडील तर तुळशीराम बनसोडे यांचे भाऊ होत.

### सिकंदर इनामदार



**सोनई :** नेवासा तालुक्यातील घोडेगाव येथील ऐंशीच्या दशकातील प्रसिद्ध बेलबॉटम फॅशन दुनियेतील जुनं नाव'' स्वागत टेलर्स''चे मालक जनाब सिकंदर बाबनभाई इनामदार (वय ८४) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात एक भाऊ,एक बहिण,पुतणे,दोन मुले, सुना,चार मुली, नातवंडे असा परिवार आहे.

महेबुब व जावेद इनामदार यांचे ते वडील होते.

## आकारपीडित शेतकऱ्यांचा लढा यशस्वी केल्याबद्दल ॲड. अजित काळे यांचा सत्कार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान :** आकारपीडित शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी न्यायालयीन तसेच आंदोलनाच्या माध्यमातून लढा यशस्वी केल्याबद्दल शेतकरी संघटनेचे राज्य उपाध्यक्ष ॲड. अजित काळे यांचा टाकळीभान ग्रामपंचायतीत जाहीर नागरी सत्कार करण्यात आला.

आकारपीडित शेतकरी संघटना, शेतकरी संघटना टाकळीभान आणि राजेंद्र कोकणे पाटील मित्र मंडळ यांच्या वतीने आयोजित या कार्यक्रमास शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी आकारपीडित शेतकरी व शेतकरी बांधवांच्या वतीने ॲड. काळे यांचे अभिनंदन करण्यात आले.

यावेळी राष्ट्रवादी किसान सभेचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र कोकणे, शेतकरी संघटनेचे प्रभारी व प्रवक्ते कार्लस साठे, युवा तालुकाध्यक्ष शरद आसने, जिल्हा संघटक भास्करराव तूवर, संपर्कप्रमुख साहेबराव चोरमत, जिल्हा उद्योग आघाडीचे अध्यक्ष अनिल बोडखे, खिर्डीचे सरपंच प्रभाकर कांबळे, युवा अध्यक्ष डॉ. रोहित कुलकर्णी, बंडोपंत चौगुले, प्राचार्य जयकर मगर, प्रा. दिलीप कोकणे यांच्यासह शेतकरी संघटनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ उपस्थित होते.




# महाराष्ट्र चेंबर व्यापाऱ्यांच्या पाठीशी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर:** आवाज उद्योजकांचा साथ महाराष्ट्र चेंबरची ' या प्रेरणेतून लहान मोठे व्यापारी सक्षम झाले पाहिजेत, सर्व परिस्थितीत बाजारात टिकून राहायला हवेत यासाठी महाराष्ट्र चेंबर त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे असे प्रतिपादन महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड ॲग्रिकल्चरचे अध्यक्ष रविंद्र मानगावे (मुंबई) यांनी केले.

वैजापूर येथील पद्मावती लॉन्स येथे वैजापूर चेंबर ऑफ ट्रेडर्स अँड ॲग्रिकल्चरतर्फे रविवारी (४ ऑक्टोबर) भव्य मराठवाडा व्यापारी परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेला महाराष्ट्र चेंबरचे माजी अध्यक्ष मानसिंह पवार, उपाध्यक्ष सुनील किर्दक, मराठवाडा चेंबरचे अध्यक्ष सुरेंद्र रेदासनी, मसिहाचे अध्यक्ष उमेश दासरथी, महाराष्ट्र चेंबरचे माजी उपाध्यक्ष सत्यनारायण लाहोटी, वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) विभागाचे अतिरिक्त आयुक्त सुमेरकुमार काळे, विजय अग्रवाल, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष अविनाश गलांडे, आमदार रमेश बोरनारे, माजी नगराध्यक्ष बाळासाहेब संचेती, नगरसेवक विशाल संचेती, बाजार समितीचे सभापती कल्याण दांगोडे, जेष्ठ नेते हाजी अकिल शेख, उप नगराध्यक्ष रियाज शेख, जिल्हा परिषद सदस्य संजय निकम, काकासाहेब कोयटे हे मान्यवर उपस्थित होते. वैजापूर चेंबरचे तालुकाध्यक्ष शांतीलाल पहाडे यांनी प्रास्ताविकात व्यापारी परिषद आयोजनामागील उद्देश सांगितला.






पहाडे यांच्यासह वैजापूर चेंबरचे काशिनाथ गायकवाड, सुरेश तांबे, उल्हास ठोंबरे, महावीर बाफना, दामोदर पारिक व अन्य पदाधिकाऱ्यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. दीपप्रज्वलन करून मराठवाडा व्यापारी परिषदेचे औपचारिक उदघाटन करण्यात आले.

या परिषदेत व्यापाऱ्यांनी वस्तू व सेवा कर पद्धती मधील क्लिष्टता, व्यापारी कर, युपीआय वरील एमडीआर याबाबत सरकारच्या धोरणाला कडाडून विरोध केला. मॉल संस्कृतीचा उदय व्यापाऱ्यांसाठी धोकादायक असल्याचे यावेळी सांगण्यात आले. अमेझॉन सारख्या कंपन्यांशी स्पर्धा करणे व्यापाऱ्यांना कठीण झाले आहे. व्यापाऱ्यांनी एकत्र यावे, पुढच्या पिढीनेही व्यापार उद्योगात उतरावे असा सल्ला जेष्ठ व्यापाऱ्यांनी दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन अनिल शहाणे यांनी केले.

## जिल्हा बँके संदर्भात लवकरच बैठक : डॉ सुजय विखे पाटील

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**निघोज:** जिल्हा सहकारी बँकेची निवडणूक बिनविरोध होण्यासाठी जी बैठक घेतली गेली ती काही अंतीम बैठक नाही उमेदवारी अर्ज भरुण झाल्यानंतर पुन्हा याबाबत बैठक घेणार असल्याची माहिती माजी खासदार डॉ सुजय विखे पाटील यांनी रविवार दि.४ रोजी राळेगणसिद्धी येथे पत्रकारांशी बोलताना दिली आहे. ते एका कार्यक्रमाच्या निमित्ताने राळेगणसिद्धी येथे आले होते. याबाबत विधानपरिषदेचे सभापती प्रा राम शिंदे यांना डावलले असल्याची चर्चा सोशल मिडीयात होत आहे. याबाबत ना. विखे पाटील व प्रा. शिंदे यांची जामखेड येथे एका कार्यक्रमाच्या निमित्ताने चर्चा झाली असून याबाबत त्यांचे समाधान झाले आहे. ही बैठक माजी मंत्री थोरात यांनी बोलावली होती. यामध्ये बिनविरोध निवडणुकीची चर्चा झाली मात्र ती काही अंतीम नाही. यावर अर्ज दाखल करणे,माघार घेणे तसेच निवडणूक यामध्ये मोठा कालावधी जाणार आहे. फोन सर्वांनाच झाले असतील मात्र वेळेअभावी किंवा व्यस्त कार्यक्रमामुळे कुणी येऊ शकले नसेल मात्र ही काही अंतीम बैठक नाही मात्र या बैठकीची चर्चा मोठ्या प्रमाणात झाल्याने काही नेतेमंडळी नाराज झाल्याच्या उलटसुलट बातम्या प्रसिद्ध झाल्या, मात्र तसे काही नाही. महाविकास आघाडीचे नेते व माजी मंत्री बाळासाहेब थोरात, नामदार राधाकृष्ण विखे पाटील, विधानपरिषदेचे सभापती प्रा राम शिंदे यांची एकत्रित बैठक होणार असून यामध्ये ही बिनविरोध निवडीची चर्चा होणार आहे. मात्र निवडणूक बिनविरोध होण्यासाठी सर्व नेतेमंडळींनी होकार दिला ही सकारात्मक बाब असून सर्वांना विश्वासात घेऊन हे काम मार्गी लावणार असल्याची माहिती माजी खासदार डॉ सुजय विखे पाटील यांनी दिली आहे.

# खरीप हंगामात दुष्काळाचा तीव्र फटका

## पिके करपली, पिण्याच्या पाण्याचाही मोठा प्रश्न

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :**खरीप हंगामात दुष्काळाचा तीव्र फटका बसल्याने शेतकऱ्यांच्या हाता–तोंडाशी आलेला घास हिरावला गेला आहे. पिके करपून अतोनात नुकसान झाल्यानंतर, आता वैजापूर तालुक्यासमोर पिण्याच्या पाण्याचा प्रचंड मोठा प्रश्न उभा ठाकला आहे. विहिरींनी आधीच तळ गाठला असताना, आता तालुक्यातील मध्यम व लघु प्रकल्पांमधील पाणीसाठाही कमालीचा घटल्याने प्रशासनाला कठोर पावले उचलण्याची वेळ आली आहे. आता पाणी केवळ पिण्यासाठीच राखीव ठेवण्यात यावे, अशा स्पष्ट आणि कडक सूचना विभागीय आयुक्त कार्यालयाकडून देण्यात आल्या होत्या. या आदेशाची गांभीर्याने दखल घेत पाटबंधारे विभागाने तातडीने सूत्रे हलवली. पाटबंधारे विभागाचे सहायक अभियंता पवन चव्हाण यांनी महावितरण विभागाच्या सहकार्याने

> ''दुष्काळात पिकांचे नुकसान झालेच आहे, परंतु आता पिण्याच्या पाण्याची भीषण समस्या निर्माण झाली आहे. विभागीय आयुक्तांच्या आदेशानुसार पाटबंधारे आणि महावितरण विभागाने संयुक्त मोहीम राबवून अवैध पाणी उपसा पूर्णपणे बंद केला आहे. उपलब्ध पाणीसाठा केवळ पिण्यासाठी राखीव ठेवण्यात आला असून, नागरिकांनी पाण्याचा वापर अत्यंत काटकसरीने करावा.''
>
> **- पवन चव्हाण,**
> **सहायक अभियंता,**
> **पाटबंधारे विभाग, वैजापूर**

तालुक्यातील सर्वच धरणांमधून सुरू असलेला अवैध पाणी उपसा बंद करण्याची धडक कारवाई युद्धपातळीवर हाती घेतली. या कारवाईमुळे धरणांमधील पाण्याचा शेतीसाठी किंवा इतर व्यावसायिक कामांसाठी होणारा बेकायदेशीर वापर थांबला असून, आगामी तीव्र पाणीटंचाईच्या काळात नागरिकांना पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी हा साठा जतन करणे शक्य होणार आहे. ऑक्टोबर महिन्याच्या सुरुवातीलाच प्रकल्पांची बिकट अवस्था पाहता, प्रशासनाची ही कारवाई अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. आगामी उन्हाळ्याची महिनागणती पाहता नागरिकांना पाण्याचा अत्यंत काटकसरीने वापर करावा लागणार असून, प्रशासनानेही आतापासूनच पाण्याचे सूक्ष्म नियोजन सुरू केले आहे.










सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये.
मो. ९९७५४७९८२६

## नशिबाची परिक्षा

सोमवार दि. ५ ऑक्टोबर २०२६

**मिलनम डे**
उदय–अस्त सिंगल ५–१–९ मजबुत

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ७ | १८०<br>१७२<br>११५ | ४ | १५८<br>२४८<br>२२० | ० | ३४५<br>३९२<br>३३६ |

१७–७०–६४–४५–६५–२४

**कल्याण**
उदय–अस्त सिंगल ९–४–५ मजबुत

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | १२०<br>३४६<br>३३७ | ० | १९०<br>२८०<br>४६० | १ | १४६<br>१२९<br>११९ |

७३–३२–४०–०६–१८–१९

**मुंबैम (मेन)**
उदय–अस्त सिंगल ४–७–९ मजबुत

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४ | १४९<br>२३९<br>३९० | ६ | १६९<br>२६८<br>६०० | १ | १७९<br>२७८<br>७०० |

१४–४३–२६–६८–०७–७९

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये.
मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 01/06/2026 to 05/06/2026 | 440 89 135 | 990 80 127 | 260 82 570 | 128 11 290 | 590 48 134 |
| 08/06/2026 to 12/06/2026 | 456 56 123 | 556 67 188 | 458 76 466 | 240 69 379 | 689 33 139 |
| 15/06/2026 to 19/06/2026 | 119 15 249 | 348 50 136 | 158 42 390 | 257 41 245 | 126 90 677 |
| 22/06/2026 to 26/06/2026 | 336 21 245 | 118 04 158 | 689 33 779 | 168 55 249 | 579 19 289 |
| 29/06/2026 to 03/07/2026 | 144 95 249 | 127 04 789 | 257 47 269 | 157 34 266 | 255 22 679 |
| 06/07/2026 to 10/07/2026 | 558 84 356 | 120 36 790 | 237 21 470 | 150 60 136 | 277 69 144 |
| 13/07/2026 to 17/07/2026 | 130 41 155 | 680 47 368 | 128 18 350 | 379 90 136 | 150 63 300 |
| 20/07/2026 to 24/07/2026 | 360 96 114 | 277 64 770 | 259 60 145 | 189 81 579 | 179 78 170 |
| 27/07/2026 to 31/07/2026 | 259 60 550 | 590 42 228 | 358 62 390 | 400 47 890 | 160 70 488 |
| 03/08/2026 to 07/08/2026 | 234 90 569 | 170 85 159 | 338 42 129 | 460 09 478 | 370 05 348 |
| 10/08/2026 to 14/08/2026 | 577 99 234 | 230 53 148 | 250 70 235 | 355 39 135 | 133 76 358 |
| 17/08/2026 to 21/08/2026 | 240 60 460 | 278 73 346 | 116 82 480 | 156 23 779 | 449 77 179 |
| 24/08/2026 to 28/08/2026 | 360 96 790 | 255 23 229 | 789 42 237 | 450 98 440 | 266 41 290 |
| 31/08/2026 to 04/09/2026 | 149 43 670 | 170 81 560 | 159 52 336 | 690 50 235 | 577 99 135 |
| 07/09/2026 to 11/09/2026 | 680 47 557 | 228 27 124 | 570 26 358 | 112 43 779 | 445 33 689 |
| 14/09/2026 to 18/09/2026 | 789 47 124 | 336 20 136 | 799 56 178 | 680 42 345 | 399 16 790 |

# शासकीय योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवा : आ. राजळे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**शेवगाव** : शासकीय योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रशासनाने अधिक गतिमान होण्याची गरज असून, नागरिकांना शासकीय सेवांसाठी वारंवार शासकीय कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागू नयेत, यासाठी सर्व शासकीय योजना एकाच ठिकाणी विविध सेवा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे, असे मत आ. मोनिका राजळे यांनी व्यक्त केले. 'सेवा संकल्प अभियान २०२६' अंतर्गत शनिवार (दि.३) शेवगाव तहसील कार्यालयात आयोजित सेवा व समाधान शिबिरात त्या बोलत होत्या.

महाराष्ट्र शासनाच्या वतीने १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबरदरम्यान 'सेवा संकल्प अभियान २०२६' राबविण्यात येत आहे. शासनाच्या योजना केवळ कागदावर न राहता त्यांचा प्रत्यक्ष लाभ सामान्य नागरिकांपर्यंत पोहोचावा, तसेच नागरिकांच्या अडचणींचे स्थानिक पातळीवर निराकरण व्हावे, या उद्देशाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले. नागरिकांच्या अडचणी समजून घेऊन त्यावर संबंधित विभागांनी तत्काळ कार्यवाही करावी.

प्रशासन आणि नागरिकांमधील संवाद वाढल्यास अनेक प्रश्न जागेवरच मार्गी लागू शकतात. पात्र लाभार्थी शासकीय योजनांपासून वंचित राहणार नाहीत, यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे, असे आवाहन आ. राजळे यांनी केले.

शिबिरात ई-केवायसी, मोबाईल क्रमांक सीडिंग, पीएमजीकेएवाय संदर्भातील मार्गदर्शन, महिला शेतकरी प्रमाणपत्रांचे वितरण, महिला आरोग्य तपासणी, घरकुल ,विविध योजनांसाठी अर्ज स्वीकारणे, तक्रार निवारण आदी सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या. पात्र लाभार्थ्यांना विविध शासकीय योजनांच्या लाभांचे वितरणही करण्यात आले. या वेळी नागरिकांनी विविध समस्या व मागण्या प्रशासनासमोर मांडल्या. संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांनी नागरिकांशी संवाद साधून त्यांच्या प्रश्नांबाबत मार्गदर्शन केले. एकाच ठिकाणी विविध शासकीय सेवा उपलब्ध झाल्याने नागरिकांना दिलासा मिळाला. यावेळी बापूसाहेब पाटेकर, महेश फलके, प्रांताधिकारी प्रसाद मते, तहसीलदार आकाश दहाडदे, नगरपरिषद मुख्याधिकारी विजया घाडगे, गटविकास अधिकारी महेश दहिफळे, महावितरणचे अधिकारी उपकार्यकारी अभियंता सचिन बनसोडे, कृषी अधिकारी अंकुश जोगदंड, नगरसेवक सागर फडके, सुनिल काकडे,खंडू बुलबुले, विनोद मोहिते,बापू धनवडे, शिवाजीराव भिसे ,राहुल सावंत, राहुल मालुसरे , सतीश लांडे, शिवाजी आधाट उपस्थित होते.

## द•ख•ल

### ऑल इंडिया प्रिन्सिपल्स असोसिएशनच्या जिल्हाध्यक्षपदी श्रीदेवी नायर



**नगर तालुका** : ऑल इंडिया प्रिन्सिपल्स असोसिएशनच्या अहिल्यानगर जिल्हाध्यक्षपदी धनगरवाडी येथील ऑर्किड इंटरनॅशनल स्कूलच्या प्राचार्या श्रीदेवी नायर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. संघटनेचे प्रादेशिक संचालक विकास मिश्रा यांनी नायर यांना नियुक्तीपत्र प्रदान केले. दर्जेदार शिक्षणासाठी असलेले समर्पण, शैक्षणिक क्षेत्रातील सातत्यपूर्ण योगदान आणि विविध उपक्रमांमध्ये बजावलेली मोलाची भूमिका याची दखल घेत त्यांची जिल्हाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. या माध्यमातून जिल्ह्यातील शैक्षणिक संस्थांमध्ये समन्वय वाढविण्यासोबतच शिक्षण क्षेत्रात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यावर भर देणार असल्याचे श्रीदेवी नायर यांनी सांगितले. शिक्षक, प्राचार्य व शैक्षणिक संस्थांसमोरील विविध समस्या संघटनेच्या माध्यमातून जाणून घेऊन त्यांचे निराकरण करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. नायर यांच्या नियुक्तीबद्दल ऑर्किड इंटरनॅशनल स्कूलमधील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसह शैक्षणिक क्षेत्रातील विविध मान्यवरांनी अभिनंदन केले.

### जनंदिनी ठोंबरे बुद्धिबळात जिल्ह्यात प्रथम : विभागीय स्पर्धेसाठी निवड



**श्रीगोंदा** : छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या जिल्हास्तरीय शालेय बुद्धिबळ स्पर्धेत येवती येथील राजनंदिनी राजेंद्र ठोंबरे हिने प्रथम क्रमांक मिळविला. या कामगिरीमुळे तिची विभागीय स्तरावरील बुद्धिबळ स्पर्धेसाठी निवड झाली आहे. राजनंदिनीने स्पर्धेत एकाग्रता आणि अचूक डावपेचांच्या जोरावर चांगली कामगिरी केली. तिच्या यशाबद्दल पालक, शिक्षक, मुख्याध्यापक, ग्रामस्थ आणि क्रीडाप्रेमींनी अभिनंदन केले.

### दुष्काळग्रस्तांसाठी जिल्हा परिषद अभियंत्यांचे एक दिवसाचे वेतन



**अहिल्यानगर** : राज्यात दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाल्याने पावसाअभावी शेतकरी आणि ग्रामीण भागातील नागरिक अडचणीत सापडले आहेत. या संकटाच्या काळात शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहण्याचा निर्णय जिल्हा परिषद अभियंता संघटना, महाराष्ट्र राज्य यांनी घेतला आहे. संघटनेच्या राज्य कार्यकारिणीच्या निर्णयानुसार राज्यातील जिल्हा परिषदांमध्ये कार्यरत असलेल्या सुमारे ४ हजार अभियंता सभासदांचे एक दिवसाचे वेतन मुख्यमंत्री सहाय्यता निधीत जमा करण्यात येणार आहे. यामधून अंदाजे ९ कोटी ५० लाख रुपयांचा निधी जमा होण्याची अपेक्षा आहे. याशिवाय राज्य संघटनेच्या वतीने १० लाख रुपयांची स्वतंत्र आर्थिक मदत मुख्यमंत्री सहाय्यता निधीस देण्यात येणार आहे. दुष्काळाच्या संकटात शेतकरी बांधवांच्या पाठीशी उभे राहणे ही आपली सामाजिक जबाबदारी आहे. त्यामुळे राज्यातील अभियंता बांधवांनी एकजुटीने घेतलेला हा निर्णय सामाजिक बांधिलकीचा आदर्श निर्माण करणारा आहे, असे अध्यक्ष राजू दिघे यांनी म्हटले आहे.

### शेतीचे पंचनामे सुरु , प्रशासन बांधावर : मदतीकडे शेतकऱ्याच्या नजरा



**खरवंडी कासार** : दुष्काळी परिस्थितीमुळे होरपळेल्या पिकाचे खरवंडी कासार परिसरात महसूल विभागामार्फत पिकांचे पंचनामे सुरु झाले असून आस्मानी संकटाचा सामना करण्यासाठी पावसावर नजरा ठेवणारा शेतकरी आता शासनाच्या मदतीकडे नजर लावून बसला आहे खरवंडी कासार सजाचे कामगार तलाठी विक्रमसिंग ब्रम्हनाथ हे शेतकऱ्यांच्या शेतात जाऊन प्रत्यक्ष पिकाचा पंचनामा करत आहेत. झालेल्या नुकसानीचा पंचनामा करून ते तहसीलदारांना अहवाल सादर करणार असल्याचे त्यांनी सांगितले. पाथर्डी तालुक्यातील खरवंडी कासार परिसरात दुष्काळाच्या तीव्र झळा जाणवत आहेत. अल्पशा पावसावर शेतकऱ्यांनी पेरणी करून काळ्या आईची ओटी भरली, पण परत पाऊस पडलाच नाही. त्यामुळे बी-बियाणे, खत, मेहनत सर्व वाया गेले आहे. बाजरी, ज्वारी, मूग या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. चारा-पाण्याअभावी पशुधन कसे जगवावे या विवंचनेत शेतकरी सापडला आहे. विहिरी कोरड्या पडल्या असून पाणी टँकरची मागणी वाढली आहे. शेतकऱ्यांनी प्रशासनाने तातडीने पिक विमा, आर्थिक मदत व चारा छावण्या सुरू कराव्यात अशी मागणी केली आहे.

# मराठी भाषेचे प्राचीन साहित्य मौल्यवान : प्राचार्य खिलारी



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**टाकळी ढोकेश्वर** : मराठी भाषेचे प्राचीन साहित्य मौल्यवान असल्याचे प्रतिपादन ढोकेश्वर विद्यालयाचे प्राचार्य बाळासाहेब खिलारी यांनी केले. मराठी भाषेला ३ ऑक्टोबर २०२४ रोजी भारत सरकारने अभिजात भाषेचा दर्जा दिला. या निमित्ताने ढोकेश्वर विद्यालयात अभिजात मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी बोलताना खिलारी पुढे म्हणाले की,मराठी भाषेची खरी ताकद तिच्या शब्द संपत्तीत,भावनेत आणि माणसांना जोडण्याच्या समर्थ्यात आहे. प्रत्येकाने मराठी भाषेचा अभिमान बाळगला पाहिजे पण त्याच वेळेस इतर भाषांचा द्वेष करता कामा नये.

यावेळी विद्यालयात ज्ञानेश्वरीची ग्रंथ दिंडी टाळ मृदूंगाच्या गजरात काढण्यात आली. नंतर वि. वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. प्रियल झावरे,आराध्या कडुस्कर,

समृद्धी जांभळकर यांनी मराठी भाषेचे वैभव,संस्कृती व वारसा याबद्दल मार्गदर्शन केले. प्राचार्य बाळासाहेब खिलारी यांनी मराठी भाषेविषयी गीत सादर केले. पारनेर येथील बी.एड कॉलेज चे छात्र अध्यापक सुदेश मुंढे यांनी बासरी वादन व गितगायन सादर केले. तन्वी गोरडे व वैष्णवी चव्हाण यांनी मराठी भाषेविषयी गीत सादर केले.रोनित कटारिया याने संत ज्ञानेश्वर व श्रीपाद मुंडे याने संत तुकाराम यांची भूमिका सादर केली.

यावेळी छत्रपती शिवराय भेदीक शाहीरी राज्यस्तरीय मेळाव्यात आण्णासाहेब चौरे गुरुजी यांना 'कै.आमदार धोंडिभाऊ पिंगट स्मृती जीवन गौरव पुरस्कार' मिळाला त्याबद्दल विद्यालयात आण्णासाहेब चौरे गुरुजी यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संपूर्ण नियोजन मराठी विषयाच्या ज्येष्ठ शिक्षिका कल्पना जाधव यांनी केले. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कल्पना जाधव यांनी तर आभार सुरेखा ठाणगे यांनी मानले.

# अहिल्यानगर केरळ समाजाचा ओनम फेस्टिव्हल उत्साहात



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : अहिल्यानगर केरळ समाजाच्या वतीने आयोजित ओनम उत्सव उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. केरळच्या समृद्ध संस्कृतीचे दर्शन घडविणारे विविध सांस्कृतिक कार्यक्रम, स्पर्धा तसेच पारंपरिक केरळी खाद्यपदार्थांची मेजवानी यावेळी आयोजित करण्यात आली होती.

केरळी समाजबांधवांसह मराठी बांधवांनीही उत्स्फूर्त सहभाग घेत उत्सवाचा आनंद लुटला. ओनम उत्सवाचे उद्घाटन धनश्री सुजय विखे पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी त्या म्हणाल्या, भारत हा विविध जाती, धर्म, भाषा आणि संस्कृतींनी नटलेला देश आहे. सण-उत्सवांच्या माध्यमातून विविध संस्कृतींचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचतो. आपली जात, देव आणि भाषा वेगळी असली तरी आपण सर्व भारतीय एक आहोत. नव्या पिढीला आपल्या संस्कृतीची व इतिहासाची ओळख करून देणे गरजेचे आहे. भारतीय सण-उत्सव आता परदेशातही उत्साहात साजरे होत असल्याचे त्यांनी सांगितले.

बाबुशेठ टायरवाले म्हणाले की, अहिल्यानगर शहरात गेल्या ४० वर्षांपासून केरळ समाजाचा ओनम उत्सव उत्साहात साजरा केला जात आहे. या उत्सवात मराठी बांधवांनाही सहभागी करून घेतले जाते. अहिल्यानगरमध्ये जन्मलेल्या नव्या पिढीला मराठी संस्कृतीसोबत केरळी संस्कृतीचीही माहिती मिळणे आवश्यक आहे. प्रत्येकाने विविध भाषा शिकल्या पाहिजेत, असे त्यांनी सांगितले.

वसंत सिंग यांनी प्रत्येकाला आपल्या संस्कृतीची ओळख असणे आवश्यक असल्याचे सांगितले. उत्सवात रांगोळी, चित्रकला स्पर्धा, महिलांसाठी सांस्कृतिक कार्यक्रम तसेच पारंपरिक केरळी खाद्यपदार्थांचे आयोजन करण्यात आले होते. विविध स्पर्धांतील विजेत्यांना पारितोषिके देण्यात आली.

### परंपरा आणि आपुलकीचा संगम

धनश्री विखे पाटील यांच्यासह उपमहापौर ॲड. धनंजय जाधव, स्थायी समिती सभापती सुभाष लोंढे, नगरसेवक व मराठी बांधवांनी केरळच्या पारंपरिक खाद्यसंस्कृतीचा आस्वाद घेतला. यावेळी केरळी समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रेणाविकरच्या शिलेदारांचा क्रीडा मैदानात डंका!



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नगर तालुका** : अहिल्यानगर महानगरपालिका शालेय जिल्हास्तरीय हॉलीबॉल स्पर्धेत म. ए. सो. रेणाविकर माध्यमिक विद्यालयाच्या संघांनी दमदार कामगिरी करत क्रीडा क्षेत्रात विद्यालयाचा ठसा उमटविला. १७ वर्षांखालील मुलींच्या संघाने विजेतेपद पटकावले, तर १४ वर्षांखालील मुलांच्या संघाने तृतीय क्रमांक मिळविला.

दि. २ व ३ ऑक्टोबर रोजी वाडिया पार्क येथे झालेल्या जिल्हास्तरीय हॉलीबॉल स्पर्धेत रेणाविकर विद्यालयाच्या खेळाडूंनी उत्कृष्ट सांघिक खेळ, जिद्द, शिस्त आणि क्रीडाकौशल्याचे प्रदर्शन केले. १७ वर्षांखालील मुलींच्या संघाने दमदार खेळ करत विजेतेपदावर नाव कोरले.

त्याचवेळी १४ वर्षांखालील मुलांच्या संघानेही उल्लेखनीय कामगिरी करत तृतीय क्रमांक पटकावला. दोन्ही संघांच्या या यशामुळे रेणाविकर विद्यालयाच्या क्रीडा गुणवत्तेची पुन्हा एकदा प्रचिती आली आहे.

या यशाबद्दल प्रशालेचे अध्यक्ष विजय भालेराव, महामात्र उमेश बिबवे व मुख्याध्यापक चंदू गवळे यांनी विजयी खेळाडूंचे अभिनंदन केले. क्रीडा शिक्षक राजेश भालसिंग व सतीश शिंदे यांचेही त्यांनी कौतुक करून खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.

# वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन आगामी काळाची गरज : आ. संग्राम जगताप

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर** : पृथ्वीवरील तापमान दिवसेंदिवस वाढत असून पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्षारोपणाबरोबरच वृक्षसंवर्धन करणे ही काळाची गरज आहे. प्रत्येकाने किमान पाच रोपे लावून त्यांचे संगोपन करण्याचा संकल्प करावा, असे आवाहन आमदार संग्राम जगताप यांनी केले.आर्किटेक्ट्स, इंजिनिअर्स अँड सर्व्हेयर्स असोसिएशन (ऐसा), अहिल्यानगरच्या वतीने माजी अध्यक्ष मकरंद देशपांडे व पोलाद स्टील यांच्या सहकार्याने नागापूर येथील ओंकार कॉलनी परिसरात वृक्षारोपणाचा उपक्रम घेण्यात आला. यावेळी आ. संग्राम जगताप यांचा संस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला.

आ. जगताप म्हणाले, वृक्षारोपण ही आता केवळ सामाजिक जबाबदारी राहिलेली नसून पर्यावरण संवर्धनासाठी अत्यावश्यक बाब झाली आहे. मात्र, झाडे लावल्यानंतर त्यांचे संगोपन व संरक्षण करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. वृक्षारोपण करताना विद्युत वाहिन्या, रस्ते, गटारे किंवा अन्य सुविधांना अडथळा निर्माण होणार नाही, याची काळजी घ्यावी. रोपांच्या संरक्षणासाठी ट्री गार्डची व्यवस्था करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

महापौर ज्योती गाडे यांनी शहर हिरवेगार करण्यासाठी नागरिकांनी वृक्षसंवर्धन मोहिमेत सहभागी होण्याचे आवाहन केले.

उपमहापौर धनंजय जाधव यांनी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त एक लाख वृक्षारोपण व संवर्धनाचा संकल्प करण्यात आला असून आतापर्यंत दहा हजारांहून अधिक झाडे लावण्यात आल्याची माहिती दिली. ऐसाचे अध्यक्ष इंजि. प्रदीप तांदळे यांनी संस्थेच्या विविध सामाजिक उपक्रमांची माहिती दिली. संस्थेने यापूर्वी वृक्षारोपणासह जलपुनर्भरणाचे उपक्रम राबविले असल्याचे त्यांनी सांगितले. मकरंद देशपांडे यांनी प्रास्ताविक केले. नगरसेवक कुमार वाकळे यांनी मनोगत व्यक्त केले.

यावेळी पोलाद स्टीलचे सुशांत गव्हाणे, आदेश गूंगे, नगरसेविका आशाताई कातोरे, सुनिता भिंगारदिवे, नवनाथ कातोरे, करण कराळे, महेश लोंढे, राजेश कातोरे, संस्थेचे पदाधिकारी, सभासद व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन उद्धव काळापहाड यांनी केले.

# करपलेल्या पिकांवर प्रशासनाची नजर; पंचनाम्यांसाठी अधिकारी बांधावर !

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**नगर तालुका** : दुष्काळाच्या तीव्र झळांमुळे नगर तालुक्यातील खरीप हंगाम जवळपास पूर्णपणे हातातून गेल्याने शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे. सोयाबीन, बाजरी तसेच चारा पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून दुष्काळ जाहीर झाल्यानंतर आता प्रशासनाने नुकसानग्रस्त पिकांच्या पंचनाम्यांना वेग दिला आहे. महसूल, कृषी आणि ग्रामपंचायत विभागाच्या संयुक्त पथकांकडून तालुक्यातील ११० गावांमध्ये युद्धपातळीवर पंचनामे सुरू आहेत.

तलाठी, ग्रामसेवक, सहायक कृषी अधिकारी व संबंधित कर्मचारी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन प्रत्यक्ष पिकांची पाहणी करून नुकसानीची नोंद घेत आहेत. पंचनाम्यात नुकसान झालेला एकही शेतकरी मदतीपासून वंचित राहू नये यासाठी वरिष्ठ अधिकारीही प्रक्रियेवर लक्ष ठेवून आहेत. तालुक्यातील डोंगरगण येथे अप्पर जिल्हाधिकारी शैलेश हिंगे, उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील आणि तहसीलदार मिलिंद कुलथे, मंडल अधिकारी राम नलावडे यांनी दुष्काळी पंचनामे तसेच पिकांच्या नुकसानीची पाहणी केली. यावेळी शेतकऱ्यांशी संवाद साधून प्रत्यक्ष परिस्थितीची माहिती घेण्यात आली.

दरम्यान पिकांचे नुकसान झाल्यानंतर आता जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्नही गंभीर बनला आहे. अनेक गावांमध्ये चारा उपलब्ध नसल्याने चारा डेपो व छावण्या सुरू करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. दुसरीकडे विहिरी, बोअरवेल व पाणीसाठे आटल्याने पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही दिवसेंदिवस गंभीर होत आहे. त्यामुळे टँकरची संख्या वाढवावी अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. नुकसानग्रस्त शेतकरी पंचनाम्यापासून वंचित राहू नये यासाठी प्रशासनाकडून सोशल मीडिया तसेच अन्य माध्यमांतून जनजागृती करण्यात येत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी प्रशासनाच्या सूचनांनुसार आवश्यक प्रक्रिया पूर्ण करून पंचनामे करून घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

# विद्याधामच्या दोन मल्लांची विभागस्तरीय कुस्तीसाठी निवड

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री




**श्रीगोंदा** : देवदैठण येथील श्री संतश्रेष्ठ निंबराज महाराज विद्याधाम प्रशालेच्या दोन कुस्तीपटूंनी जिल्हास्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेत सुवर्णपदक पटकावत पुणे विभागस्तरीय स्पर्धेसाठी आपली निवड निश्चित केली आहे.

या यशामुळे विद्याधामच्या क्रीडा क्षेत्रातील कामगिरीत आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे. नेवासाफाटा येथील त्रिमूर्ती संकुलात झालेल्या अहिल्यानगर जिल्हास्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेत राजलक्ष्मी महेश चव्हाण हिने १४ वर्षे वयोगटातील फ्रीस्टाईल कुस्तीच्या ३३ किलो वजनगटात प्रतिस्पर्धीला चितपट करून प्रथम क्रमांक पटकावला.

तर रोहन भास्कर मोटे याने १९ वर्षे वयोगटातील ग्रिको-रोमन कुस्तीच्या १३० किलो वजनगटात दमदार कामगिरी करत सुवर्णपदक मिळविले. दोन्ही खेळाडूंची सोलापूर जिल्ह्यातील करमाळा येथे होणाऱ्या पुणे विभागस्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली असून, ते अहिल्यानगर जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार आहेत. या खेळाडूंना क्रीडाशिक्षक संदीप घावटे, अमोल कातोरे, गणेश भोंडवे, महेश चव्हाण तसेच विविध तालमीतील वस्ताद व प्रशिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या यशाबद्दल संस्थेचे पदाधिकारी, मुख्याध्यापक, शिक्षक, ग्रामस्थ व क्रीडाप्रेमींनी अभिनंदन करून विभागस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

## दखल

## स्वच्छता ही सेवा अभियानातून सासवडमध्ये विविध उपक्रमांना वेग

सासवड : 'स्वच्छता ही सेवा २०२६' आणि 'सेवा संकल्प अभियान' अंतर्गत सासवड नगर परिषदेच्या वतीने शहरात स्वच्छता, पर्यावरण संवर्धन, आरोग्य, जनजागृती तसेच नागरिकाभिमुख विविध सेवा प्रभावीपणे राबविण्यात येत आहेत. नागरिकांना शासकीय सेवा तातडीने व सुलभ पद्धतीने उपलब्ध करून देण्यावरही नगर परिषदेने भर दिला आहे, अशी माहिती मुख्याधिकारी कैलास चव्हाण यांनी दिली.

१७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या अभियानातून 'स्वच्छ, सुंदर, हरित आणि सक्षम सासवड' घडविण्याचा प्रयत्न केला जात आहे. मालमत्ता हस्तांतरण, नवीन नळजोडणी, जन्म-मृत्यू नोंद प्रमाणपत्र, कर आकारणी, बांधकाम परवाना, झोन दाखला, बचत गट नोंदणी, ना-हरकत प्रमाणपत्र, ८-अ उतारा आदी विविध दाखले व सेवा नागरिकांना उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

अभियानांतर्गत शहरातील सहा महत्त्वाच्या ठिकाणी विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता, कचरा व्यवस्थापन आणि स्वच्छतेबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात आली. पर्यावरण संवर्धनासाठी 'एक पेड माँ के नाम' उपक्रमांतर्गत वृक्षारोपण करण्यात आले.सफाई कर्मचाऱ्यांच्या आरोग्याची काळजी घेत ग्रामीण रुग्णालय, सासवड यांच्या सहकार्याने आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणपूरक सण साजरे करण्याची भावना रुजविण्यासाठीही विविध उपक्रम घेण्यात आले.शहरातील बाजारपेठ परिसरात व्यापारी व नागरिकांच्या सहभागातून प्लास्टिकमुक्ती अभियान राबविण्यात आले. तसेच ओला व सुका कचरा स्वतंत्रपणे संकलित करणे, कचरा वर्गीकरण आणि घरच्या घरी कंपोस्टिंग करण्याबाबत जनजागृती व कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले.

## धामणीत आकर्षक बैलजोड्या बनविण्याला वेग



**धामणी येथे बैलजोड्यांना रंगाचा अखेरचा हात फिरविताना शंकर नामदेव सोनवणे.**

धामणी : आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील धामणी येथे भाद्रपद बैलपोळ्याच्या पार्श्वभूमीवर विविध आकारांच्या आकर्षक बैलजोड्या बनविण्याच्या कामाला वेग आला आहे. धामणी येथील व्यावसायिक शंकर नामदेव सोनवणे यांनी यंदा सुमारे तीन हजार बैलजोड्या तयार केल्या असून, त्यांच्या कलाकुसरीच्या बैलजोड्यांना पुणे, मुंबईसह यवतमाळपर्यंत मागणी आहे.

बैलपोळा हा शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याचा सण असून, या दिवशी शेतकरी आपल्या बैलांची पूजा करून त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करतात. सणाच्या पार्श्वभूमीवर सजविलेल्या बैलांसोबतच आकर्षक बैलजोड्यांनाही विशेष महत्त्व असते. ही परंपरा जपत सोनवणे गेल्या काही वर्षांपासून बैलजोड्या तयार करण्याचा व्यवसाय करीत आहेत.यंदा त्यांनी विविध आकार व प्रकारांतील सुमारे तीन हजार बैलजोड्या तयार केल्या आहेत. या बैलजोड्यांची किंमत २० रुपयांपासून तीन हजार रुपयांपर्यंत आहे. ग्राहकांच्या मागणीनुसार विविध आकारांत आणि आकर्षक रंगसंगतीत तयार केलेल्या बैलजोड्यांना चांगला प्रतिसाद मिळत आहे. धामणीत तयार झालेल्या बैलजोड्या पुणे, मुंबईसह यवतमाळपर्यंत पोहोचत असल्याने या पारंपरिक कलेला मोठी बाजारपेठ मिळाली आहे.

आधुनिकतेच्या काळातही ग्रामीण संस्कृती आणि बैलपोळ्याची परंपरा जपण्याचे काम या माध्यमातून सुरू आहे. पारंपरिक कलेला व्यवसायाची जोड देणाऱ्या सोनवणे यांच्या उपक्रमाचे परिसरातून कौतुक होत आहे.

# वसुलीसोबत वीजपुरवठ्याची गुणवत्ता सुधारा : दिनेश अग्रवाल

## २०५ कोटींची थकबाकी चालू बिलासोबत वसूल करा

### महावितरणच्या कार्यकारी संचालकांचे क्षेत्रीय अभियंत्यांना निर्देश

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** वारंवार इशारा देऊनही २०५ कोटींची थकबाकी शिल्लक राहिल्याबद्दल नाराजी व्यक्त करत, ही थकबाकी ऑक्टोबर महिन्यात कोणत्याही परिस्थितीत वसूल करा, तसेच वीजपुरवठ्याची गुणवत्ता सुधारा, अन्यथा कठोर कारवाईला सामोरे जा, असा इशारा महावितरणचे कार्यकारी संचालक (वाणिज्य) दिनेश अग्रवाल यांनी पुण्यातील अधिकाऱ्यांना दिला.पालक संचालक म्हणून अग्रवाल दर आठवड्याला पुणे परिमंडलाचा आढावा घेतात. शनिवारी (दि. ३) दुपारी झालेल्या आढावा बैठकीत त्यांनी वीजबिल वसुली, वीजपुरवठा, सेवा सेतू व सेवा संकल्प अभियान आदींचा उपविभागनिहाय आढावा घेतला.

या बैठकीला प्रभारी मुख्य अभियंता ज्ञानदेव पडळकर, अधीक्षक अभियंता सिंहाजीराव गायकवाड, सुरेश सवाईराम, सहायक महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) कीर्ती भोसले यांच्यासह पुणे परिमंडलातील सर्व विभागांचे कार्यकारी अभियंते, उपविभागीय अभियंते व अधिकारी उपस्थित होते. अग्रवाल म्हणाले, सप्टेंबर महिन्याअखेर २०५ कोटी ८७ लाख रुपयांची थकबाकी शिल्लक आहे. पुण्यासाठी ही चांगली बाब नाही. ऑक्टोबर महिन्याच्या चालू बिलासोबत ही थकबाकी वसूल करा. पुढच्या शनिवारपर्यंत ही थकबाकी वसूल झालेली असावी. ऑक्टोबर हिटला सुरुवात झाली आहे. त्यामुळे वीजपुरवठ्याकडेही सर्वांनी लक्ष द्यावे. आपापल्या कार्यक्षेत्रातील वीजपुरवठा अखंडितपणे सुरू राहील यासाठी प्रत्येकाने दक्षता घ्यावी, तसेच वीजगळती रोखून महावितरणचा महसूल वाढवावा.

सेवा सेतू आणि सेवा संकल्प अभियानाबाबतही सर्वांनी सजग राहण्याचे आवाहन करताना जास्तीत जास्त किऑस्क उभारून ग्राहकांना महावितरणच्या सेवांचा लाभ द्यावा, असे अग्रवाल यांनी सांगितले.

## अकरा वर्षीय मुलीशी गैरवर्तन; टपरीधारकाला अटक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**आळेफाटा :** जुन्नर तालुक्यातील एका गावात अकरा वर्षीय अल्पवयीन मुलीशी गैरवर्तन केल्याप्रकरणी टपरीधारकाविरुद्ध ओतूर पोलिस ठाण्यात पोक्सो कायद्यासह विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी पोलिसांनी बादशाह पापाभाई मोमीन याला अटक केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १४ सप्टेंबर रोजी रात्री आठच्या सुमारास मुलगी घराजवळील गोळ्या-बिस्किटांच्या टपरीवर गेली होती. त्यावेळी टपरीधारकाने पैसे देण्याचे आमिष दाखवून तिच्याशी गैरवर्तन केले. तसेच, हा प्रकार कोणाला सांगितल्यास वाईट परिणाम भोगावे लागतील, अशी धमकी दिल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.घाबरलेल्या मुलीने सुरुवातीला हा प्रकार घरी सांगितला नाही. त्यानंतर तिने शाळेतील शिक्षिकेला माहिती दिली. शिक्षिकेने मुलीच्या आईला बोलावून घेतल्यानंतर पोलिसांकडे तक्रार देण्यात आली.या प्रकरणी ओतूर पोलिस ठाण्यात पोक्सो कायद्यासह विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून पुढील तपास ओतूर पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगीरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक संदिप आमणे करीत आहेत.

## गावडेवाडीत बिबट्याचा धुमाकूळ

### पोल्ट्री फार्ममधील कोंबड्यांवर हल्ला, ३०० कोंबड्या दगावल्या

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**निरगुडसर :** आंबेगाव तालुक्यातील गावडेवाडी येथे बिबट्याने अक्षरशः धुमाकूळ घातला असून, रविवारी पहाटेच्या सुमारास प्रवीण वायाळ यांच्या पोल्ट्री फार्ममध्ये शिकारीच्या शोधात घुसलेल्या बिबट्याने कोंबड्यांचा फडशा पाटला आहे. अचानक केलेल्या बिबट्याच्या हल्ल्याने तब्बल ३०० कोंबड्या घाबरून मयत झाले आहेत.या घटनेमुळे परिसरातील शेतकरी व नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.



**गावडेवाडी ता. आंबेगाव येथे बिबट्याच्या हल्ल्यात मयत झालेल्या कोंबड्या.**

गावडेवाडी येथील प्रवीण वायाळ यांच्या पोल्ट्री फार्ममध्ये साडेपाच ते सहा हजार कोंबड्या होत्या. रविवारी पहाटेच्या सुमारास बिबट्याने पोल्ट्री फार्मच्या कम कुवत जाळीचा फायदा घेत जाळी तोडून आत प्रवेश केला. त्यानंतर अंदाजे २० ते २२ दिवसांच्या सुमारे ३०० कोंबड्यांवर हल्ला करून त्यांना ठार केले. या घटनेत पोल्ट्री व्यावसायिकाचे अंदाजे ४५ हजार रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. सकाळी पोल्ट्री फार्ममध्ये कोंबड्या मृतावस्थेत आढळून आल्यानंतर ही घटना उघडकीस आली. विशेष म्हणजे, पोल्ट्री फार्मच्या अगदी शेजारी ऊसाचे क्षेत्र आहे. या परिसरात बिबट्याच्या पायांचे ठसेही आढळून आले आहेत. त्यामुळे बिबट्या याच ऊस क्षेत्रात आश्रय घेत असण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

घटनेची माहिती मिळताच वन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेत पाहणी केली. मृत कोंबड्यांचा पंचनामा करण्यात आला असून, नुकसानभरपाई मिळण्यासाठी आवश्यक कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. दरम्यान, बिबट्याला लवकरात लवकर जेरबंद करण्यासाठी वन विभागाकडून आवश्यक उपाययोजना करण्यात येणार असल्याची माहिती वनपरिक्षेत्र अधिकारी विकास भोसले यांनी दिली. गावडेवाडी परिसरात यापूर्वीही बिबट्याचा वावर जाणवत असल्याने शेतकरी आणि नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. ऊस क्षेत्र तसेच मानवी वस्तीजवळ बिबट्याचा वावर वाढल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे वन विभागाने बिबट्याचा तातडीने बंदोबस्त करून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी परिसरातून होत आहे.

## डेंग्यू-मलेरियाच्या पार्श्वभूमीवर कवठे येमाईत फॉगिंग

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

कवठे येमाई : डेंग्यू, मलेरिया यांसारख्या डासजन्य आजारांचा धोका लक्षात घेता कवठे येमाई गावठाणात ग्रामपंचायत प्रशासनाने प्रतिबंधात्मक उपाययोजना सुरू केल्या आहेत. दैनिकातून डासांच्या वाढत्या उपद्रवाबाबत वृत्त प्रसिद्ध झाल्यानंतर काल सायंकाळी फॉगिंग मशिनद्वारे विविध भागांत औषध फवारणी करण्यात आली.

गावात सध्या प्रचंड उकाडा असून, सायंकाळच्या वेळी दोन ते तीन तास डासांचा मोठ्या प्रमाणात उपद्रव होत असल्याने ग्रामस्थ त्रस्त आहेत. डासांची संख्या वाढत असल्याने डेंग्यू, मलेरियासारख्या आजारांचा धोका निर्माण होऊ नये, यासाठी ग्राम पंचायतीने प्रभावी उपाययोजना करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात आली होती.

ग्रामपंचायत कर्मचारी अजित शिंदे व अमोल पंचरास यांनी फॉगिंग मशिनच्या माध्यमातून ग्रामपंचायत कार्यालय परिसर, वीर हनुमान मंदिर परिसर, मुख्य बाजारपेठ, तांबट आळी ते सोसायटी परिसरात औषध फवारणी केली. फॉगिंग सुरू झाल्याने ग्रामस्थांना काहीसा दिलासा मिळाला असला तरी डासांचा वाढता उपद्रव पाहता केवळ एक-दोन दिवसांची फवारणी पुरेशी नसून सातत्यपूर्ण व व्यापक डास प्रतिबंधक मोहीम राबविण्याची गरज आहे.



**डासांची उत्पत्तीस्थळे नष्ट करण्याची मागणी**

गावातील साचलेले पाणी, नाले-गटारे, कचरा तसेच इतर संभाव्य डास उत्पत्तीस्थळांची पाहणी करून ती नष्ट करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे. फॉगिंगसोबत नियमित औषध फवारणी आणि स्वच्छता मोहीम राबवावी, अशीही मागणी होत आहे. उशिराने का होईना, ग्रामपंचायत प्रशासनाने घेतलेली दखल स्वागतार्ह असून ही मोहीम सातत्याने सुरू ठेवण्याचे आव्हान प्रशासनासमोर आहे.

## निरगुडसर येथे बेकायदा दारू विक्रीवर कारवाई

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**निरगुडसर :** आंबेगाव तालुक्यातील निरगुडसर गावच्या हद्दीत बेकायदा देशी दारू विक्री करणाऱ्या व्यक्तीवर पारगाव पोलिसांनी कारवाई केली. या कारवाईत ८०० रुपये किमतीच्या देशी दारूच्या दहा बाटल्या जप्त करण्यात आल्या.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २९ सप्टेंबर रोजी हॉटेल किनाराच्या पाठीमागे दारू विक्री सुरू असल्याची माहिती पारगाव पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक सचिन कांडगे यांना मिळाली. त्यांच्या सूचनेनुसार पोलिसांनी पंचांसह घटनास्थळी जाऊन पाहणी केली. त्यावेळी लक्ष्मण गोरख लोंढे वय ४५, रा. आडगाव, ता. अकोले, जि. अहिल्यानगर हा पिशवीत देशी दारूच्या बाटल्या घेऊन बसलेला आढळून आला.

पिशवीची झडती घेतली असता जी. एम. संत्रा देशी दारूच्या दहा बाटल्या, असा एकूण ८०० रुपये किमतीचा मुद्देमाल आढळला. पोलिसांनी तो जप्त केला. पोलिस अंमलदार बाबाजी नायकोडी यांच्या फिर्यादीवरून लोंढे याच्याविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम कलम ६५ ई अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## बारामती दूध संघाची वार्षिक सभा उत्साहात

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

बारामती : बारामती तालुका सहकारी दूध उत्पादक संघाची ४९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा कसबा, बारामती येथील शरद सभागृहात उत्साहात पार पडली. सभेत दूध उत्पादकांच्या हितासाठी राबविण्यात येणाऱ्या योजना तसेच आगामी वर्षातील विकासकामांची माहिती देण्यात आली.

**पाच कोटींचा स्वयंचलित दुग्धपदार्थ निर्मिती प्रकल्प :**
**सन २०२६-२७ मध्ये माळेगाव येथील नंदन डेअरीमध्ये सुमारे पाच कोटी रुपये खर्चाचा स्वयंचलित दुग्धपदार्थ निर्मिती प्रकल्प उभारण्यात येणार आहे. तसेच १२ मेट्रिक टन क्षमतेचा दूध पावडर प्रकल्प उभारण्याचे नियोजन आहे. नंदन डेअरी व पशुखाद्य प्रकल्प येथे सौरऊर्जा यंत्रणा, नंदन डेअरीमध्ये खनिज पाणी प्रकल्प आणि भिगवण रस्ता येथील संघाच्या वसाहतीत व्यावसायिक इमारत उभारण्याचेही प्रस्तावित आहे.**

सन २०२५-२६ मध्ये संघाचे सरासरी प्रतिदिन २.४६ लाख लिटर दूध संकलन झाले. दूध उत्पादकांना प्रतिलिटर ४० पैसे आणि प्राथमिक दूध संस्थांना ३५ पैसे, असा एकूण ७५ पैसे प्रतिलिटर दूध दरफरक देण्यात आला. सभासदांना १३ टक्के लाभांश देण्यात आला आहे. एप्रिल ते सप्टेंबर २०२५ या कालावधीतील पशुखाद्य विक्रीवर प्रतिपोते ५० रुपये दरफरक देण्यात आला. संघाच्या कायम कर्मचाऱ्यांना २५ टक्के बोनस आणि अडीच पगारांचे प्रोत्साहन देण्यात आल्याची माहिती सभेत देण्यात आली.संघाचे अध्यक्ष किशोर फडतरे यांनी प्रास्ताविकात संघाच्या कामकाजाचा आढावा घेतला. संघाच्या प्रगतीसाठी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, खासदार पार्थ पवार आणि युवा नेते जय पवार यांच्या मार्गदर्शनाचा लाभ होत असल्याचे त्यांनी सांगितले.

## सोमेश्वर मंदिरात भाविकांसाठी शुद्ध, थंड पाण्याची सुविधा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**सोमेश्वरनगर :** ऑक्टोबर हिटमुळे उन्हाची तीव्रता वाढत असताना सोमेश्वर मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांसाठी निक्सा ग्रुप, सोमेश्वरनगर यांच्या वतीने शुद्ध पाण्याचा फिल्टर आणि थंड पाण्याचा चिलर उपलब्ध करून देण्यात आला आहे. त्यामुळे सोमेश्वर स्वयंभू शिवलिंगाचे दर्शन घेण्यासाठी येणाऱ्या भाविकांना शुद्ध व थंड पाणी पिण्यास मिळणार असून, वाढत्या उष्णतेपासून काहीसा दिलासा मिळणार आहे.

यंदा पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने वातावरणात उष्णतेची धग जाणवत आहे. त्यातच ऑक्टोबर महिन्यात उन्हाची तीव्रता वाढत असल्याने मंदिर परिसरात येणाऱ्या भाविकांसाठी पिण्याच्या पाण्याची सुविधा महत्त्वाची ठरत आहे. सोमेश्वर पंचक्रोशीसह विविध जिल्ह्यांतून दर सोमवारी मोठ्या संख्येने भाविक बारामती तालुक्यातील करंजे येथील सोमेश्वर स्वयंभू शिवलिंगाच्या दर्शनासाठी येत असतात. या भाविकांची पाण्याची गरज लक्षात घेऊन निक्सा ग्रुपने ही सुविधा उपलब्ध करून दिली आहे.

या शुद्ध पाण्याच्या फिल्टरचे उद्घाटन युवा नेते युगेंद्र पवार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष अनंत मोकाशी, निक्सा ग्रुपचे अध्यक्ष निलेश गायकवाड तसेच ग्रुपचे पदाधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

निक्सा ग्रुपच्या या उपक्रमामुळे सोमेश्वर मंदिरात येणाऱ्या शिवभक्तांना उन्हाच्या तीव्रतेपासून काहीसा दिलासा मिळणार असून, सामाजिक बांधिलकी जपत भाविकांसाठी करण्यात आलेल्या या उपक्रमाचे परिसरातून कौतुक होत आहे.



## येमाई देवी नवरात्रोत्सवाची ११ ऑक्टोबरपासून पर्वणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कवठे येमाई :** कवठे येमाई ग्रामदैवत येमाई देवीचा शारदीय नवरात्र महोत्सव यंदा ११ ते २० ऑक्टोबरदरम्यान भक्तिभावात आणि उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. या कालावधीत विविध धार्मिक, सांस्कृतिक तसेच भजन-कीर्तन कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

नवरात्रोत्सवानिमित्त दररोज सकाळी सप्तशती वाचन, गोंधळी आरती आणि महापूजा, तर सायंकाळी सप्तशती वाचन, आरती, पूजा, नैवेद्य व गोंधळ असे धार्मिक कार्यक्रम होणार आहेत. विविध भजनी मंडळे, आराधी संगीत पार्टी तसेच धार्मिक संस्थांच्या सहभागातून भजन, देवीची गाणी, होमहवन आणि संगीत कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. शिरूर, कवठे येमाई, आंबेगाव, राजगुरुनगर, जुन्नर आणि अहिल्यानगर परिसरातील भाविक व कलाकार सहभागी होणार आहेत.

नवरात्रोत्सवात होमहवनाचा विशेष धार्मिक कार्यक्रम होणार असून, विजयादशमीच्या दिवशी देवीची महापूजा, देवीची गाणी आणि सीमोल्लंघनासाठी पालखी प्रस्थान होणार आहे. जुन्या येमाई माता मंदिरासमोर सीमोल्लंघन पालखीची प्रदक्षिणा करून मंदिरात प्रवेशाचा पारंपरिक सोहळा पार पडणार आहे.

दरम्यान, संस्थान व ग्रामस्थांच्या सहकार्याने मंदिर परिसरात विविध विकासकामे करण्यात आली आहेत. महागणपती मंदिर, पुंजाबा मंदिर, तुळशी वृंदावन, जाळी कंपाऊंड, महिला व पुरुष प्रसाधनगृह, भक्तिनिवास, दर्शनबारी व शेड, पडवी नूतनीकरण, दक्षिणमुखी मारुती मंदिर नूतनीकरण, मंदिर रंगकाम, पेव्हिंग ब्लॉक, पालखी कक्ष, कार्यालय, वृक्षलागवड, सभामंडप, स्टील ग्रील, फरशी व पत्राशेड आदी कामांचा त्यात समावेश आहे.

नवरात्रोत्सवातील सर्व धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचा भाविकांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन येमाई देवी संस्थान व ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.





द•ख•ल

## शिवाजीराव कर्डिले यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त धार्मिक कार्यक्रम



**नगर :** लोकनेते माजी मंत्री स्वर्गीय आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त बुऱ्हाणनगर येथे १८ ते २१ ऑक्टोबरदरम्यान विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाच्या नियोजनासाठी आमदार अक्षय कर्डिले यांच्या अध्यक्षतेखाली राहुरी, नगर व पाथर्डी तालुक्यातील प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्त्यांची बैठक झाली. १८ ते २० ऑक्टोबरदरम्यान सायंकाळी ६ ते ९ या वेळेत राष्ट्रीय श्रीमद् भागवत कथाकार जया किशोरीजी यांची भागवत कथा होणार आहे. २१ ऑक्टोबर रोजी सकाळी ९ ते १२ या वेळेत राष्ट्रीय कीर्तनकार जयवंत महाराज बोधले यांची कीर्तन सेवा होणार असून, त्यानंतर उपस्थित नागरिकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे. आ. अक्षय कर्डिले म्हणाले, स्व. कर्डिले कोणताही कार्यक्रम कार्यकर्त्यांना विश्वासात घेऊन नियोजित करीत. त्याच पद्धतीने पुण्यस्मरणाचा कार्यक्रम प्रत्येकाने आपल्या घरातील कार्यक्रम समजून दिलेली जबाबदारी पार पाडावी. कार्यक्रमास हजारो नागरिक, कार्यकर्ते तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित राहणार असल्याने चोख नियोजन करण्याचे आवाहन त्यांनी केले. बैठकीस भाजप जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग, उपसभापती रभाजी सुळ, बाजीराव गवारे, अभिलाष घिगे, संदीप कर्डिले, रोहिदास कर्डिले यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## स्व. दिगंबरराव बागल शिक्षक सहकारी पतसंस्थेकडून डॉ. राऊत यांचा सत्कार



**राशीन :** प्राणिशास्त्र विषयात पीएच.डी. प्राप्त करून जैवविविधता संशोधन क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे युवा शास्त्रज्ञ व जैवविविधता संशोधक डॉ. रणजित रावसाहेब राऊत यांचा स्व. दिगंबरराव बागल शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या वतीने पुष्पगुच्छ व शाल देऊन विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी पतसंस्थेचे चेअरमन, व्हाइस चेअरमन, सचिव तसेच सर्व संचालक मंडळाचे सदस्य उपस्थित होते. डॉ.रणजित रावसाहेब राऊत यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर येथून प्राणिशास्त्र विषयात पीएच.डी. पदवी संपादन केली आहे. तसेच त्यांनी जैवविविधता,वन्यजीव संरक्षण,पर्यावरण संवर्धन आणि जनजागृतीच्या क्षेत्रात विविध उपक्रम राबविले आहेत. यावेळी पतसंस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी डॉ.राऊत यांच्या संशोधन कार्याचे कौतुक करून त्यांच्या पुढील शैक्षणिक व सामाजिक कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

ग्रामीण भागातून पुढे येऊन संशोधन क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या डॉ.राऊत यांचा सत्कार हा विद्यार्थी व युवा संशोधकांसाठी प्रेरणादायी असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. कार्यक्रमास पतसंस्थेचे पदाधिकारी, संचालक मंडळाचे सदस्य तसेच शिक्षक व सभासद उपस्थित होते.

## माहेश्वरी समाजातील तरुणांचे योगदान व संघटनकार्य आदर्श : श्रीकांत जाजू

**पाथर्डी :** माहेश्वरी समाजातील युवकांनी समाजबांधणीसाठी पुढाकार घेऊन बदलत्या काळातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी सक्रिय योगदान द्यावे. तरुणाईचा पुढाकार समाजासाठी आशादायक ठरणार आहे, असे प्रतिपादन माहेश्वरी समाजाचे जिल्हाध्यक्ष श्रीकांत जाजू यांनी केले.

माहेश्वरी राम मंदिरात दर शुक्रवारी होणाऱ्या बालाजीच्या सामूहिक आरतीला एक वर्ष पूर्ण झाल्याबद्दल तसेच समाजातील विविध पदांवर नव्याने निवड झालेल्या पदाधिकाऱ्यांच्या सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी माहेश्वरी युवक संघटनेच्या जिल्हाध्यक्षपदी श्रीरामपूरचे उद्योजक अभिषेक बियाणी यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

यावेळी जिल्हा संघटनेचे सचिव डॉ. नितीन मालाणी, जिल्हा संघटक रमण बिहानी, तालुका महासभेचे अध्यक्ष संदीप मंत्री, राम मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. विलास बाहेती, युवक मंडळाचे अध्यक्ष राधेश्याम मंत्री आदी उपस्थित होते.

गोविंद लाहोटी यांनी गेल्या वर्षभरात समाजबांधवांच्या सहकार्याने विविध उपक्रम यशस्वी झाल्याचे सांगितले. आगामी शारदीय नवरात्रोत्सवात मोहटादेवी गडावर समाजबांधव स्वयंसेवक म्हणून सेवा देणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

जाजू यांनी माहेश्वरी युवक मंडळाच्या कार्याचा गौरव करत समाजातील ज्येष्ठांच्या सेवा संस्काराचा वारसा युवकांनी पुढे न्यावा, असे आवाहन केले. आगामी काळात विविध उपक्रम व योजनांच्या माध्यमातून 'समाज जोडो, समाज बचाओ' हा संकल्प राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक गोविंद लाहोटी, सूत्रसंचालन महेश बाहेती यांनी केले. अलोक बंग यांनी आभार मानले.

# जामखेडमध्ये ४३५ युवक-युवतींची थेट नोकरीसाठी निवड

## आ. रोहित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त रोजगार मेळावा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**जामखेड :** ग्रामीण भागातील युवक-युवतींना त्यांच्या शैक्षणिक पात्रता, कौशल्य व अनुभवाच्या आधारे रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी आमदार रोहित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त जामखेड येथे रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. नागेश विद्यालय व कन्या विद्यालयात झालेल्या या मेळाव्यास युवक-युवतींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. तब्बल ९२९ उमेदवारांनी सहभाग नोंदवला, तर विविध नामांकित कंपन्यांनी घेतलेल्या प्रत्यक्ष मुलाखतींतून ४३५ युवक-युवतींची जागेवरच निवड करण्यात आली. याशिवाय १३५ उमेदवारांची पुढील प्रक्रियेसाठी निवड करण्यात आली. निवड झालेल्या उमेदवारांना यावेळी नियुक्तीपत्रे देण्यात आली.

रयत शिक्षण संस्थेचा उत्तर विभाग, नागेश विद्यालय व कन्या विद्यालय, कर्जत-जामखेड एकात्मिक विकास संस्था आणि आमदार रोहित पवार मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. ग्रामीण भागातील युवकांना रोजगारासाठी मोठ्या शहरांकडे स्थलांतर करावे लागू नये, तसेच स्थानिक पातळीवरच त्यांच्या शिक्षण व कौशल्यानुसार रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने विविध कंपन्या व उमेदवारांना एकाच व्यासपीठावर आणण्यात आले.




मेळाव्याचे अध्यक्ष म्हणून रयत शिक्षण संस्थेच्या उत्तर विभाग, अहिल्यानगरच्या समन्वय समितीचे सदस्य राजेंद्र कोठारी उपस्थित होते. रयत शिक्षण संस्थेच्या उत्तर विभागाच्या सल्लागार समितीचे सदस्य विजयसिंह गोलेकर, जामखेड पंचायत समितीचे माजी सभापती सूर्यकांत मोरे, ॲड. मयूर डोके आदी उपस्थित होते.

विविध कंपन्यांच्या प्रतिनिधींनी उमेदवारांच्या शैक्षणिक पात्रता, कौशल्य व अनुभवाच्या आधारे प्रत्यक्ष मुलाखती घेतल्या. त्यामुळे रोजगाराच्या शोधात असलेल्या युवक-युवतींना कंपन्यांच्या प्रतिनिधींशी थेट संवाद साधण्याची आणि रोजगाराची संधी मिळाली. युवकांच्या हाताला काम मिळण्यासोबतच त्यांच्या कुटुंबांना आर्थिक स्थैर्य मिळावे, यासाठी अशा रोजगाराभिमुख उपक्रमांना सातत्याने व्यापक स्वरूप देण्याची गरज यावेळी व्यक्त करण्यात आली.

मेळाव्याच्या यशस्वी आयोजनासाठी नागेश विद्यालयाचे मुख्याध्यापक एस. व्ही. जाधवर, कन्या विद्यालयाच्या मुख्याध्यापिका आर. आर. भोर, रोजगार मेळावा समन्वयक श्रीराम सातपुते तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. विविध कंपन्यांचे प्रतिनिधी, ग्रामस्थ, पालक आणि जामखेड तालुका व पंचक्रोशीतील उमेदवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

४३५ युवक-युवतींची जागेवरच निवड आणि १३५ उमेदवारांची पुढील प्रक्रियेसाठी निवड झाल्याने हा मेळावा ग्रामीण युवकांसाठी रोजगाराची नवी संधी उपलब्ध करून देणारा ठरला.

# पर्यावरण संवर्धन व स्वच्छता अभियानाला सहा वर्षे पूर्ण

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कर्जत :** महात्मा गांधी जयंतीचे औचित्य साधून २ ऑक्टोबर २०२० रोजी सुरू झालेल्या कर्जतच्या सर्व सामाजिक संघटनांच्या पर्यावरण संवर्धन व स्वच्छता अभियानाला सहा वर्षे पूर्ण झाली. या निमित्ताने शनिवार व रविवारी महाश्रमदान आणि सहा हजार वृक्षलागवडीचा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमाला विधान परिषदेचे सभापती राम शिंदे आणि खासदार निलेश लंके यांच्या पत्नी राणी लंके यांनी उपस्थिती लावत श्रमप्रेमी व विद्यार्थ्यांचा उत्साह वाढविला.गेल्या सहा वर्षांपासून या सामाजिक संघटनांचे श्रमप्रेमी दररोज एक तास नियोजित ठिकाणी श्रमदान करून स्वच्छता व पर्यावरण संवर्धनाचे काम करीत आहेत. सहा वर्षपूर्तीनिमित्त शनिवारी शहरात महाश्रमदान घेण्यात आले. विविध सामाजिक संघटना, विद्यार्थी आणि निसर्गप्रेमींनी सहभाग घेत शहरातील अस्वच्छ परिसर स्वच्छ केला. यावेळी राणी लंके यांनी खासदार निलेश लंके यांच्या विकास निधीतून उपलब्ध करून देण्यात आलेले १०० कचरापेट्या सामाजिक संघटनेकडे सुपूर्द केल्या.

रविवारी कर्जत शहरातील जैवविविधता क्षेत्रात अवघ्या एका तासात सहा हजार वृक्षांची लागवड करण्यात आली. यावेळी सभापती राम शिंदे यांनी उपस्थित राहून श्रमप्रेमींचा उत्साह वाढविला. मानवी साखळीच्या माध्यमातून सहा वर्षांच्या कार्याचा जागर करण्यात आला. त्यानंतर पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारी सायकल रॅली काढून कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.



**राज्यस्तरीय पुरस्काराचीही कमाई**

या श्रमदान चळवळीमुळे कर्जत नगरपंचायतीला 'माझी वसुंधरा' अभियानात उल्लेखनीय यश मिळाले आहे. पहिल्या स्पर्धेत कर्जतने द्वितीय क्रमांक मिळविला, तर दुसऱ्या स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला. पिवळ्या टी-शर्टमुळे या सामाजिक संघटनेची वेगळी ओळख निर्माण झाली असून श्रमप्रेमी एक कुटुंबाप्रमाणे सुख-दुःखात सहभागी होतात. तिसऱ्या वर्षपूर्तीनिमित्त टाकाऊ बादल्यांपासून कचरापेट्या तयार करून त्यांचे वाटप करण्यात आले होते.

**सभापतींच्या नशिबात आलेला 'फॅन' गेला दुसऱ्याच्या वाट्याला!**

सहा वर्षपूर्तीनिमित्त उपस्थितांसाठी लकी ड्रॉ ठेवण्यात आला होता. त्यात सभापती राम शिंदे यांच्या नावाची चिठ्ठी निघून त्यांना पंखा बक्षीस लागला. मात्र बक्षीस स्वीकारण्यासाठी कार्यक्रमस्थळी उपस्थित राहणे हा निकष होता. श्रमदानानंतर नियोजित दौऱ्यासाठी ते रवाना झाल्याने त्यांना बक्षीस घेता आले नाही. अखेर हा 'फॅन' दुसऱ्याच्या वाट्याला गेला.

## जिल्हा सहकारी बँक निवडणूक

### खा. नीलेश लंके यांच्या अस्तित्वाची लढाई ?

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**निघोज :** अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीच्या निमित्ताने जिल्ह्यातील राजकीय समीकरणांना पुन्हा एकदा धार आली आहे. खासदार नीलेश लंके यांनी पारनेर सोसायटी मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल केल्याने विखे गटाशी त्यांचा राजकीय संघर्ष पुन्हा चर्चेत आला आहे. त्यामुळे ही निवडणूक लंके यांच्या राजकीय अस्तित्वासाठी महत्त्वाची ठरणार का, याबाबत पारनेर तालुक्यात चर्चा सुरू झाली आहे.

जिल्हा बँकेची निवडणूक बिनविरोध करण्यासाठी प्रमुख नेत्यांकडून प्रयत्न सुरू आहेत. मात्र, सर्व संबंधितांना विश्वासात घेऊनच निर्णय झाला पाहिजे, अशी भूमिका खासदार लंके यांनी मांडली आहे. व्यक्तीद्वेषातून एखाद्याला डावलून निवडणूक बिनविरोध करण्याचा प्रयत्न झाल्यास त्याला विरोध राहील, असे त्यांनी स्पष्ट केले आहे.



दरम्यान, माजी मंत्री बाळासाहेब थोरात व माजी खासदार डॉ. सुजय विखे यांच्या पुढाकाराने बिनविरोध निवडणुकीसाठी बैठक झाल्यानंतर विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांनी या प्रक्रियेबाबत प्रश्न उपस्थित केले होते. दुसरीकडे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, बाळासाहेब थोरात आणि राम शिंदे यांच्यात समन्वयातून निर्णय घेण्याबाबत चर्चा सुरू असल्याचेही समोर आले आहे. त्यामुळे बिनविरोध निवडणुकीच्या प्रयत्नांसोबतच विविध गटांची स्वतंत्र राजकीय मोर्चेबांधणी सुरू असल्याचे चित्र आहे. पारनेर तालुक्यातील सोसायटी मतदारसंघातील ठरावांच्या प्रक्रियेतही विविध गटांनी आपापल्या समर्थकांचे ठराव होण्यासाठी प्रयत्न केले. या पार्श्वभूमीवर लंके गटाकडून आपल्याकडे पुरेसे संख्याबळ असल्याचा दावा केला जात आहे. मात्र अंतिम चित्र अर्जांची छाननी, माघार आणि अंतिम मतदार यादी प्रसिद्ध झाल्यानंतरच स्पष्ट होणार आहे. पारनेरच्या राजकारणात लंके यांनी आमदारकीनंतर लोकसभा निवडणुकीतही आपले राजकीय स्थान निर्माण केले. आता जिल्हा बँकेच्या माध्यमातून सहकार क्षेत्रातही प्रभाव निर्माण करण्याच्या त्यांच्या प्रयत्नांकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. याउलट विखे गटाकडूनही बँकेवरील प्रभाव कायम ठेवण्यासाठी हालचाली सुरू आहेत. जिल्हा बँकेच्या निवडणुकीसाठी मोठ्या संख्येने इच्छुकांनी अर्ज दाखल केले आहेत. त्यामुळे बिनविरोधाचा तोडगा निघतो की निवडणूक प्रत्यक्ष मैदानात होते, याकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# शासनाच्या आरोग्य सुविधा शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवा : डॉ. सागर बोरुडे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** शासनाच्या माध्यमातून नागरिकांसाठी उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या विविध आरोग्य सुविधा समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी व्यापक जनजागृती करावी. महापालिकेच्या आरोग्य केंद्रांमध्ये मोफत औषधे व विविध आरोग्य सुविधा उपलब्ध आहेत. मात्र, अनेक नागरिकांना त्याची माहिती नसल्याने या सुविधांची केंद्रनिहाय माहिती दर्शनी भागात फलकाद्वारे लावावी, अशा सूचना एकात्मिक आरोग्य समितीचे अध्यक्ष डॉ. सागर बोरुडे यांनी दिल्या.

अहिल्यानगर महानगरपालिकेच्या सावेडी येथील प्रभाग कार्यालयात एकात्मिक आरोग्य समितीची बैठक डॉ. बोरुडे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी ते बोलत होते. महापालिकेच्या माध्यमातून शहरातील नागरिकांना विविध आरोग्य सेवा दिल्या जात आहेत. त्यांचा गरजू नागरिकांना प्रत्यक्ष लाभ मिळण्यासाठी आरोग्य विभागाने अधिक प्रभावीपणे जनजागृती करण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.




महापालिकेच्या आरोग्य केंद्रांमध्ये मोफत औषधांसह मधुमेह, सर्दी-खोकला यावरील उपचार, टी.टी. लसीकरण, रेबीज प्रतिबंधक इंजेक्शन आदी सुविधा उपलब्ध आहेत. या सुविधांची माहिती आशा सेविका व आरोग्य सेविकांनी नागरिकांपर्यंत पोहोचवावी. विशेषतः सर्वसामान्य व गरजू कुटुंबांना शासकीय आरोग्य योजनांचा लाभ मिळेल, यासाठी प्रयत्न करावेत, असे डॉ. बोरुडे यांनी स्पष्ट केले.

प्रत्येक प्रभाग समिती कार्यालयानुसार दर महिन्याला आरोग्यविषयक बैठक घेऊन कामकाजाचा आढावा घेतला जाईल. आरोग्य सेवांमध्ये कामचुकारपणा किंवा निष्काळजीपणा आढळल्यास संबंधितांवर कारवाई केली जाईल, असा इशाराही त्यांनी दिला.

मनपा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजूरकर यांनी महापालिकेच्या विविध आरोग्य केंद्रांसह 'आपला दवाखाना'च्या माध्यमातून नागरिकांना आरोग्य सुविधा दिल्या जात असल्याचे सांगितले. नागरिकांनी या सुविधांचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

बाळासाहेब देशपांडे दवाखान्यात महिलांसाठी सोनोग्राफी, क्ष-किरण, प्रसूतीसह विविध आरोग्य सुविधा उपलब्ध असल्याची माहिती डॉ. राजूरकर यांनी दिली. बैठकीत आरोग्य सेविकांनी केंद्रांमधील अडचणी व विविध समस्यांची माहिती समितीसमोर मांडली.

यावेळी डॉ. वृषाली आरु, डॉ. आरती ढापसे, डॉ. शिल्पा चेलवा, सुमित जाधव यांच्यासह आरोग्य सेविका व आशा सेविका उपस्थित होत्या.

# नातवंडांच्या सहवासात आजी-आजोबांचे फुलले बालपण !

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**टाकळी ढोकेश्वर :** जागतिक ज्येष्ठ नागरिक दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार टाकळी ढोकेश्वर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत 'आजी-आजोबा, शिक्षक व मुले' मेळावा उत्साहपूर्ण आणि भावनिक वातावरणात पार पडला. नातवंडांसोबत वेळ घालवताना आजी-आजोबांच्या जुन्या आठवणींना उजाळा मिळाला आणि शाळेच्या वातावरणात जिव्हाळ्याचा क्षण अनुभवायला मिळाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अहमदनगर जिल्हा मराठा शिक्षण संस्थेचे ज्येष्ठ विश्वस्त सीताराम खिलारी पाटील होते.



दीपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. विद्यार्थ्यांच्या आजी-आजोबांचे औक्षण करून गुलाबपुष्प देत स्वागत करण्यात आले. नातवंडांनी आजी-आजोबांचे पाद्यपूजन करून विविध गीते व कविता सादर करत त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली. नातवंडांच्या हस्ते खाऊ व भेटवस्तू देऊन आजी-आजोबांचा सन्मान करण्यात आला.

**मराठी शाळांनी घडविल्या कर्तृत्ववान पिढ्या**

१८९२ साली पत्र्याच्या खोलीतून सुरू झालेल्या आपल्या मराठी शाळेने जुन्या काळात शेती व स्वावलंबनाचे प्रत्यक्ष संस्कार रुजवून राष्ट्रपती पुरस्कार विजेत्या शिक्षकांसह कर्तृत्ववान पिढ्या घडवल्या आहेत. आधुनिक इंग्रजी माध्यमाच्या शाळांचे आकर्षण असलेल्या काळातही विद्यार्थ्यांची बौद्धिक क्षमता आणि सुसंस्कृत जडणघडण जिल्हा परिषदेच्या मराठी शाळेतच होते, असे मत सीताराम खिलारी पाटील, ज्येष्ठ विश्वस्त, जिल्हा मराठा शिक्षण संस्था यांनी व्यक्त केले.

यावेळी आजी-आजोबांनी मनोगत व्यक्त करत शाळेने आयोजित केलेल्या या आगळ्या उपक्रमाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. सूत्रसंचालन करताना प्रविण झावरे यांनी अनुभव, संस्कार आणि आंतरपिढीतील संवादाचे महत्त्व अधोरेखित केले. नातवंडांच्या सहवासात आजी-आजोबांनी जुन्या आठवणींना उजाळा देत आनंद व्यक्त केला.

याप्रसंगी उपस्थित विद्यार्थी, शिक्षक व पालकांनी कुटुंबातील तसेच समाजातील ज्येष्ठ नागरिकांचा सदैव आदर व सन्मान राखण्याची शपथ घेतली. या उपक्रमातून ज्येष्ठांचा सन्मान, संस्कारांची देवाणघेवाण आणि कुटुंबातील जिव्हाळ्याचे नाते अधिक दृढ करण्याचा संदेश देण्यात आला.कार्यक्रमाचे नियोजन मुख्याध्यापक राजेंद्र ठुबे, शिक्षक सुचेता खिलारी, अलका भनगडे, जयश्री गाडेकर, संध्या घोलप, लतिफाभी तांबोळी व बाबाजी नवले यांनी केले. शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी, ग्रामस्थ, आजी-आजोबा आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कर्जत तालुक्यात पाणी-टंचाई गडद

## २५ गावे, १७६ वाड्या-वस्त्यासाठी धावतात २० टँकर: डॉ अफरोजखान पठाण

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कर्जत :** कर्जत तालुक्यातील २५ गावे आणि १७६ वाड्या-वस्त्यांच्या ४२ हजार १४ नागरिकांना २० टँकरद्वारे ३४ खेपांनी पाणी-पुरवठा सुरू असल्याची माहिती गटविकास अधिकारी अजिंक्य सुर्यवंशी यांनी दिली. वाढत्या उन्हाच्या तडाख्याने आणि परतीच्या पावसाची शक्यता नसल्याने दुष्काळजन्य परिस्थिती गंभीर असून उपलब्ध पाणीसाठयाचा वापर काटकसरीने करावा असे आवाहन केले आहे.




यंदा मान्सून पावसाने चांगलाच दगा दिला आहे. त्यात परतीच्या पावसावर भिस्त होती मात्र ऑक्टोबर हिटचा तडाखा पाहता ती आशा देखील संपुष्टात आली आहे. कर्जत तालुक्यात सध्या २५ गावांना पाण्याचे टँकर सुरू असल्याची माहिती कर्जत पंचायत समिती विभागाकडून देण्यात आली. यात २० टँकरने १७६ वाड्या-वस्त्याच्या जवळपास ४२ हजार नागरिकांची तहान भागवली जात आहे. सदरचे टँकर खेड, कुळधरण, पाटेवाडी आणि मांदळी येथील उदभवातून भरले जात आहे. परतीच्या पावसाची शक्यता नसल्याने भविष्यात पाणी टंचाई अधिक तीव्र होणार असून नागरिकानी पाण्याचा वापर काटकसरीने करावा असे आवाहन तालुका प्रशासनाकडून करण्यात येत आहे. यासह उपलब्ध जलस्रोतांमधील पाणी फक्त पिण्यासाठीच आरक्षित करण्याची मागणी पुढे येत असून कोणी ही या जलसाठ्यातून अवैध पाणी उपसा न करता प्रशासनास सहकार्य करावे. मागील काळात पुणे धरण क्षेत्रात समाधानकारक आणि मुसळधार पावसामुळे उजनी धरणात मोठ्या प्रमाणात पाणीसाठा असल्याने धरणाच्या बॅकवॉटर क्षेत्रातील १५ ते २० गावांचा प्रश्न सुटला असून यासह कुकडी लाभक्षेत्रातील ३० ते ३५ गावांस विशेष आवर्तन सुटल्याने थोड्या प्रमाणात पाणीसाठा उपलब्ध आहे त्याचा वापर अत्यंत जपून करावा असे आवाहन गटविकास अधिकारी अजिंक्य सुर्यवंशी यांनी केले. कोंभळी,कोरेगाव व मिरजगाव जिल्हा परिषद गटात भीषण परिस्थितीची शक्यता गृहीत धरून या परिसरातील ग्रामपंचायत आराखड्यातील प्रस्तावित कामे स्थगित करीत फक्त पाणी उपाययोजनेवर खर्च करणेबाबत सूचना देण्यात आल्या.

**कर्जत तालुक्यातील या २५ गावात धावत आहे पाण्याचे टँकर**

**कर्जत आजमितीस २५ गावांमध्ये २० पाण्याचे टँकर धावत आहे. टँकर सुरू असलेली गावे पुढीलप्रमाणे : मुळेवाडी, डिकसळ, कापरेवाडी, खांडवी, कौडाणे, चादे बुद्रुक, परीटवाडी, चादे खुर्द, गुरवपिंपरी, नवसरवाडी, आखोणी, चिंचोली काळदात, वालवड, सुपे, नागमठाण, रेहेकुरी, टाकळी खंडेश्वरी, नागलवाडी, माही, करपडी, दुरगाव, बहिरोबावाडी, खंडाळा, कोंभळी आणि नागापुर या गावांना ३४ खेपा मंजूर आहे.**

**कर्जत पंचायत समितीद्वारे ऑक्टोबर २०२६ ते जून २०२७ चा संभाव्य पाणी-टंचाई आराखडा गावनिहाय तयार केला आहे. यात प्राप्त अहवालानुसार भविष्यात ७७ गावांना टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याची नामुष्की ओढावली जाऊ शकते. त्यानुसार खबरदारीचा उपाय म्हणून विशेष उपाय योजनेतर्गत २ बुडक्या आणि १२ सार्वजनिक विहीर खोल करणे, ६८ विहीर अधिग्रहण करणे, १२ नळ योजनांची दुरुस्ती कामे तसेच १० नवीन इंधन विहीर घेणे आदी कामे टंचाई आराखड्यात प्रस्तावित करण्यात आली असल्याची अजिंक्य सुर्यवंशी यांनी दिली.**

# समर्थ फार्मसीत वन्यजीव सप्ताहाचे आयोजन

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

निघोज: समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी व समर्थ कॉलेज ऑफ फार्मसी बेल्हे यांच्या संयुक्त विद्यमाने वन्यजीव सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. वन्यजीव हे पर्यावरणीय समतोलाचे महत्त्वाचे घटक असून, त्यांचे संरक्षण ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. वन्यजीवांविषयी वैज्ञानिक दृष्टिकोन, संवर्धनाची जाणीव आणि पर्यावरणपूरक जीवनशैली विकसित करण्याचा संदेश या सप्ताहाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत 'सर्पविषापासून औषधनिर्मितीपर्यंत' या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. नारायणगाव येथील वैद्यकीय तज्ज्ञ डॉ. सदानंद राऊत यांनी विद्यार्थ्यांना सर्पदंश प्रतिबंध, प्रथमोपचार, प्रतिविष उपचार तसेच सर्पविषाचा औषधनिर्मितीतील उपयोग याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

डॉ. राऊत यांनी सर्पविष व इतर विषारी पदार्थ यांतील शास्त्रीय फरक, सर्पविषाची रचना, त्यातील विविध घटक आणि त्यांचा मानवी शरीरावर होणारा परिणाम यांची माहिती दिली. सर्पविषापासून प्रतिविष तयार करण्याची प्रक्रिया, त्यामागील वैज्ञानिक संकल्पना आणि सर्पदंशाच्या उपचारातील प्रतिविषाचे महत्त्व त्यांनी स्पष्ट केले.

डॉ.राऊत यांनी विषारी व बिनविषारी सापांची ओळख,




सर्पदंशापासून बचावाचे उपाय आणि साप आढळल्यास घ्यावयाची काळजी याबाबत मार्गदर्शन केले.

कार्यक्रमास संस्थेचे कॅम्पस डायरेक्टर प्रा.राजीव सावंत,समर्थ इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. कुलदीप रामटेके, समर्थ कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ.संतोष घुले, प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रा.शुभम गडगे यांनी सूत्रसंचालन केले, तर प्रा.वैशाली भुतांबरे यांनी आभार मानले.

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री

सोमवार दि.०५ ऑक्टोबर २०२६ | अहिल्यानगर | पान नं. ८

## शनिशिंगणापुरात दर्शनासाठी आलेल्या कर्नाटकच्या महिलेचे निधन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिंगणापूर** : शनिशिंगणापूर येथे दर्शनासाठी आलेल्या कर्नाटकमधील ४७ वर्षीय महिलेचा हृदयविकाराच्या धक्क्याने मृत्यू झाला. नायक अनुसया कृष्णा (वय ४७, रा. बंगळुरू, कर्नाटक) असे तिचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शनिदर्शनासाठी आलेल्या अनुसया यांची प्रकृती बिघडल्याने शनिवारी दुपारी १.१३ वाजता त्यांना शनैश्वर हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते. मात्र, उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी जाहीर केले. याबाबत डॉक्टरांच्या माहितीनुसार, शनिशिंगणापूर पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद करून पुढील कार्यवाही सुरू केली आहे. मृत्यूचे नेमके कारण वैद्यकीय तपासणी व शवविच्छेदन अहवालानंतरच स्पष्ट होणार आहे. या प्रकरणाचा तपास सहायक पोलिस निरीक्षक दीपक धनवटे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस हवालदार जी. ती मोकाने करीत आहेत.

# अवैध वाळू वाहतूक करणारा जेसीबी, डंपर जप्त

## २० लाखांचा मुद्देमाल हस्तगत

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव** : कोपरगाव तालुका पोलिस ठाण्याच्या हद्दीत मायगाव देवी परिसरात अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या जेसीबी व डंपरवर अपर पोलिस अधीक्षक, श्रीरामपूर यांच्या कार्यालयाच्या पथकाने कारवाई केली. या कारवाईत दोन जणांवर गुन्हा दाखल करून जेसीबी, डंपर व वाळू असा एकूण २० लाख ३० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. अपर पोलिस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांच्या आदेशानुसार अपर पोलिस अधीक्षक कार्यालयातील पोलिस पथक कोपरगाव तालुका पोलिस ठाण्याच्या हद्दीत अवैध धंद्यांविरोधात कारवाईसाठी गस्त घालत होते. ३ ऑक्टोबर रोजी पथकाला मायगाव देवी शिवारातील मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्यावर जेसीबीच्या साहाय्याने डंपरमध्ये अवैधरीत्या वाळू भरली जात असल्याची माहिती मिळाली.



माहितीची खात्री करून पथकाने पंचांसह दुपारी साडेतीनच्या सुमारास संबंधित ठिकाणी छापा टाकला. यावेळी जेसीबीच्या साहाय्याने डंपरमध्ये वाळू भरताना दोन्ही चालकांना पकडण्यात आले. जेसीबी चालक किशोर देवीदास धोत्रे (वय २६, रा. मायगाव देवी, ता. कोपरगाव) आणि डंपर चालक सुरेश सुकदेव सोनवणे (वय ३८, रा. शिंगणापूर, ता. कोपरगाव) अशी त्यांची नावे आहेत. दोघांकडे वाळू वाहतुकीचा वैध परवाना नसल्याचे चौकशीत समोर आले.

संबंधित वाळू गोदावरी नदीपात्रातून आणून साठविल्याचेही त्यांनी पोलिसांना सांगितले. कारवाईत जेसीबी क्रमांक एमएच १७ डीजे ४५८०, डंपर क्रमांक एमएच १२ एसएक्स २३१३ आणि सहा ब्रास वाळू असा २० लाख ३० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

याप्रकरणी कोपरगाव तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ४५४/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३(२), ३(५) तसेच पर्यावरण (संरक्षण) अधिनियम १९८६ मधील कलम ३, १५ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास कोपरगाव तालुका पोलिस करीत आहेत.

ही कारवाई पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलिस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे, उपविभागीय पोलिस अधिकारी अमोल भारती व पोलिस निरीक्षक संभाजी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

## देवदैठणमध्ये पाच शेतकऱ्यांच्या मोटारी व स्टार्टरची एकाच रात्री चोरी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा** : श्रीगोंदा तालुक्यातील देवदैठण परिसरात चोरट्यांनी एकाच रात्री पाच शेतकऱ्यांच्या विहिरींवरील पाण्याच्या मोटारी व स्टार्टर पेट्या चोरून नेल्याची घटना समोर आली आहे. या प्रकारामुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, शेतीच्या सिंचन व्यवस्थेवरही मोठा परिणाम झाला आहे.

याबाबत पोलीस सूत्रांकडून समजलेली सविस्तर माहिती अशी की, चोरट्यांनी इंद्रभान वाघमारे यांच्या विहिरीवरील स्टार्टर पेटी व मोटर, सदाशिव नारायण कौठाळे यांची मोटर व स्टार्टर पेटी, अमोल जाधव यांची तीन एचपीची मोटर, दगडू कौठाळे यांची स्टार्टर पेटी व मोटर तसेच संतोष पाराजी कौठाळे यांची स्टार्टर पेटी व मोटर चोरून नेली. एकाच रात्री पाच शेतकऱ्यांच्या शेतातील विद्युत मोटारी व स्टार्टर चोरीला गेल्याने ही घटना नियोजनबद्ध असल्याची शक्यता शेतकऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे. या चोरीमुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले असून, पुन्हा नवीन मोटार व स्टार्टर खरेदी करण्याचा अतिरिक्त आर्थिक भार त्यांच्यावर पडणार आहे.

सध्या परिसरात पाणीटंचाई व दुष्काळी परिस्थितीचा सामना शेतकऱ्यांना करावा लागत आहे. अशा परिस्थितीत शेतीला पाणी देण्यासाठी आवश्यक असलेल्या मोटारीच चोरीला गेल्याने शेतकऱ्यांसमोर मोठे संकट उभे राहिले आहे. एकीकडे दुष्काळाचे संकट आणि दुसरीकडे शेतीतील साहित्य चोरी, अशा दुहेरी संकटामुळे शेतकरी मेटाकुटीला आले आहेत. देवदैठण परिसरातील शेतांमध्ये रात्रीच्या वेळी गस्त वाढवावी, मोटार चोरीच्या घटनांचा तपास करून चोरट्यांचा शोध घ्यावा आणि चोरीला गेलेल्या मोटारी व स्टार्टरचा तपास करून संबंधित शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे.

एकाच रात्री पाच ठिकाणी चोरी झाल्याने पोलिसांनी या घटनेची गांभीर्याने दखल घेऊन मोटार चोरीमागील टोळीचा शोध घेणे गरजेचे आहे, अशी भावना शेतकरी व्यक्त करत आहेत.

## विद्युत खांबावर स्पर्किंगमुळे चार एकर ऊस खाक

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर** : विद्युत वाहिनीच्या खांबावर झालेल्या स्पार्किंगमुळे उसाच्या शेताला भीषण आग लागून तब्बल ४ एकर ऊस व शेतातील शेतीचे साहित्य जळून खाक झाल्याची घटना नागमठाण शिवारात ता.३ शनिवार रोज दुपारी १:५० वाजण्याच्या सुमारास नागमठाण शिवारातील गट. क्र. २९० मध्ये घडली आहे.दुष्काळाशी दोन हात करून कसेबसे उसाचे पीक वाचवले मात्र हातातोंडाशी घास हिरवला गेला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, नागमठाण शिवारातील गट क्र. २९० मध्ये शेतकरी गोकुळ आसाराम तागड, कृष्णा आसाराम तागड व आसाराम बारकू तागड यांच्या संयुक्त उसाच्या फडाला अचानक आग लागली.



या आगीत ४ एकर वरील ऊस, अंदाजे किंमत ४ ते ५ लाख रुपये, शेतातील सोलर पॅनल किंमत १ ते दीड लाख रुपये तसेच स्प्रिंकलर,ठिबक, पाईप किंमत ८० ते ९० हजार रुपये किमतीचे साहित्य जळून खाक झाले आहे. यामुळे शेतकऱ्याचे मोठी आर्थिक नुकसान झाले आहे.महावितरणच्या ३३/११ के.व्ही. नागमठाण उपकेंद्रातून जाणाऱ्या नागमठाण गाव फीडरवरील आरएसजे पोल आणि एबी स्विचवर स्पार्किंग झाल्याने ही आग लागल्याची घटना घडली आहे.

घटनेची माहिती मिळताच वरिष्ठ तंत्रज्ञ वाय. व्ही. कदम यांनी तातडीने कनिष्ठ अभियंते विलास कोळेकर यांना कळवले. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी वीज पुरवठा खंडित केला आणि घटनास्थळी धाव घेतली.

आग विझवण्यासाठी वैजापूर नगर परिषदेच्या अग्निशमन दलाच्या गाडीला बोलवण्यात आले.अग्निशमन दलाचे जवान आणि स्थानिक ग्रामस्थ शेतकरी यांच्या मदतीने आग भिजवण्याचे प्रयत्न करण्यात आले मात्र तीव्र उन्हामुळे या आगीने रौद्ररूप धारण केले. आग आटोक्यात येईपर्यंत शेतातील संपूर्ण ४ एकर क्षेत्रातील उसाचे पीक व साहित्य पूर्णपणे जळून खाक झाले होते. ज्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

या दुर्घटनेनंतर ता.४ ऑक्टोबर रविवार रोजी ग्राम महसूल अधिकारी गावंडे महावितरणचे कनिष्ठ अभियंता विलास कोळेकर यांनी प्रत्यक्ष पाहणी करून घटनास्थळी शेतकरी कृष्णा आसाराम तागड आणि पंचांच्या उपस्थितीत पंचनामा करण्यात आला.नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना महावितरण आणि प्रशासनाकडून लवकरात लवकर नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

## जिल्हा बँक हा राजकीय आखाडा नाही । शेतकऱ्यांच्या हिताची निवडणूक : डॉ. विखे पाटील

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी** : जिल्हा बँकेची निवडणूक बिनविरोध व्हावी यासाठी प्रयत्न सुरू आहेत. मात्र निवडणूक लागलीच तर शेतकऱ्यांचे हित डोळ्यासमोर ठेवून पूर्ण ताकदीने सामोरे जाण्याची आमची तयारी आहे. जिल्हा बँक हा राजकीय आखाडा नसून शेतकरी हिताची संस्था आहे, असे प्रतिपादन भारतीय जनता पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांनी केले. राहाता येथील सिद्ध संकल्प सभागृहात आयोजित जिल्हा बँक संवाद मेळाव्यात ते बोलत होते. जिल्हा बँकेच्या निवडणुकीसाठी मोठ्या संख्येने अर्ज दाखल झाले असून पदे मर्यादित आहेत. त्यामुळे सर्वांचे समाधान करणे शक्य नाही. निवडणूक बिनविरोध करण्यासाठी सभापती राम शिंदे यांच्याशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दूरध्वनीवरून संवाद साधला असून, अर्ज प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर सर्वांना विश्वासात घेण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे विखे यांनी सांगितले.



जिल्ह्यात दुष्काळाची गंभीर परिस्थिती असून गेल्या चार महिन्यांत पाऊस झालेला नाही. सोयाबीनचे पीक जळून चालले असून पंचनामे सुरू आहेत. अशा परिस्थितीत दुष्काळात शेतकऱ्यांना मतदानासाठी बाहेर पडावे लागू नये, यासाठी निवडणूक बिनविरोध करण्याचा प्रयत्न असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. जिल्हा बँकेची धुरा सहकार क्षेत्रातील अनुभवी लोकांकडेच असावी आणि सहकारात काम करणारे लोकच संचालक म्हणून यावेत, ही भूमिका असल्याचेही त्यांनी सांगितले. जिल्हा बँक अडचणीत आल्यास सामान्य शेतकऱ्याला त्याचा फटका बसतो. त्यामुळे ही निवडणूक कोणाच्या प्रतिष्ठेची नसून शेतकरी हिताची आहे. निवडणूक झाली तर ती पूर्ण ताकदीने लढू, असे विखे यांनी स्पष्ट केले.

माजी मंत्री बाळासाहेब थोरात व पालकमंत्र्यांमध्ये अंतर्गत समझोता असल्याच्या चर्चेवर बोलताना विधानसभा निवडणुकीचा निकाल हेच त्याचे उत्तर असल्याचे त्यांनी सांगितले. वैचारिक मतभेद असले तरी एकमेकांचा सन्मान राखला पाहिजे. जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका महायुती विरुद्ध महाविकास आघाडी अशा पद्धतीने पूर्ण ताकदीने लढल्या जातील, मात्र रोजची टीका ही भूमिका नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. कार्यकर्त्यांचा सन्मान आपल्या पदापेक्षा मोठा असून, कोणत्याही कार्यकर्त्याला वाकायला लावणार नाही, असे सांगत विखे यांनी जिल्हा बँकेच्या निवडणुकीला सामोरे जाण्यास आम्ही पूर्ण तयार असल्याचे स्पष्ट केले.

## लंडनमधील आंतरराष्ट्रीय केसरी कुस्ती स्पर्धेत त्रिमूर्तीच्या युवराजला सुवर्णपदक

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : नेवासा फाटा येथील त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठान संचलित, त्रिमूर्ती कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील एम.एस्सी. (बॉटणी) द्वितीय वर्षात शिक्षण घेत असलेला विद्यार्थी पै. युवराज मोहन खोपडे यांने लंडन येथे संपन्न झालेल्या आंतरराष्ट्रीय केसरी कुस्ती स्पर्धेत ९५ किलो वजन गटात प्रथम क्रमांक पटकावत सुवर्णपदक मिळविले आहे



युवराज खोपडे याने आपल्या उत्कृष्ट कुस्ती कौशल्याच्या जोरावर आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी करत त्रिमूर्ती महाविद्यालयासह महाराष्ट्र राज्याचे नाव उंचावले आहे. त्याच्या या यशामुळे महाविद्यालय परिसरात आनंदाचे वातावरण असून, त्यांच्यावर सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

या उल्लेखनीय यशाबद्दल त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठानतर्फे पै. युवराज खोपडे यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठानच्या अध्यक्षा श्रीमती सुमतीताई घाडगे पाटील, उपाध्यक्षा डव्होकेट स्नेहल घाडगे- चव्हाण पाटील,मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.गौरव आमले पाटील,विश्वस्त चेतन चव्हाण पाटील, डॉ.श्रुती आमले पाटील, समन्वयक डॉ. अनुराधा गोरे, त्रिमूर्ती सीनियर कॉलेजचे प्राचार्य डॉ. चांगदेव आरसुळे, उपप्राचार्य प्रा.निकिता बर्गे,प्रा.संभाजी निकाळजे, शारीरिक शिक्षण संचालक प्रा. प्रशांत जायगुडे तसेच महाविद्यालयातील मान्यवर उपस्थित होते. या खेळासाठी त्याला आंतरराष्ट्रीय पंच संभाजीराव निकाळजे यांनी अधिक मेहनत घेतली. त्याच्या या यशाबद्दल महाविद्यालय प्रशासन, त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठान, शिक्षकवृंद व विद्यार्थ्यांनी त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले असून, त्यांच्या पुढील क्रीडा वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा व्यक्त केल्या आहेत.

# नेवासा शहरात चोरीचे सत्र सुरूच

## शेतकऱ्याला मारहाण करून १.२७ लाखांचा ऐवज लंपास



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : नेवासा शहर व परिसरात चोरीचे सत्र सुरूच असून, नेवासा खुर्द येथील उस्थळ रोडवरील कदम वस्तीवर सहा अनोळखी चोरट्यांनी शेतकऱ्याच्या घरात घुसून त्याला मारहाण केली. शस्त्रांचा धाक दाखवून हात-पाय बांधत घरातील सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम असा एकूण १ लाख २७ हजार ५०० रुपयांचा ऐवज चोरून नेल्याची घटना ३ ऑक्टोबरच्या मध्यरात्री घडली.

### चोरीच्या घटनांनी नागरिकांमध्ये भीती

नेवासा शहर व परिसरात गेल्या दोन दिवसांत जबरी चोरीच्या घटना घडल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. वारंवार घडणाऱ्या चोरीच्या घटनांमुळे पोलिसांसमोरही आव्हान निर्माण झाले असून, दहशत निर्माण करणाऱ्या चोरट्यांचा लवकरात लवकर तपास लावावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

विजय गोरक्षनाथ कदम (४५, रा. शेत गट नं. ४३१, कदम वस्ती, उस्थळ रोड, नेवासा खुर्द) हे घराच्या पोर्चमध्ये झोपले असताना मध्यरात्री साडेबारा वाजण्याच्या सुमारास सहा अनोळखी व्यक्ती त्यांच्या जवळ आल्या. त्यांच्या हातात काठ्या, कोयते व लोखंडी गज होते. त्यापैकी एकाने कदम यांच्या डाव्या गुडघ्यावर लाकडी दांड्याने मारहाण करून हालचाल केल्यास जीवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर चोरट्यांनी घराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला.

चार जणांनी घरातील कपाटाची उचकापाचक करून दागिने व रोख रक्कम ताब्यात घेतली, तर दोघांनी कदम यांच्यावर लक्ष ठेवले. त्यानंतर चोरट्यांनी कदम यांचे हात-पाय बांधून त्यांना मारहाण केली व घरात कोंडून तेथून पसार झाले. काही वेळाने त्यांचा पुतण्या गणेश कदम याने घर उघडून त्यांची सुटका केली. घराची पाहणी केली असता सोन्याचे दागिने, चांदीचे दागिने व रोख रक्कम चोरीस गेल्याचे आढळले. चोरट्यांनी सोन्याची पोत, बाळी, नथ, अंगठी, कुडक, चांदीचे दागिने तसेच २३ हजार रुपये रोख असा एकूण १ लाख २७ हजार ५०० रुपयांचा ऐवज लंपास केला.

या प्रकरणी नेवासा पोलिस ठाण्यात सहा अज्ञात चोरट्यांविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३१०(२), ११८(२), ११५(२) व ३५१(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनास्थळी ठसेतज्ज्ञ व श्वान पथकाला पाचारण करण्यात आले. श्वानाने काही अंतरापर्यंत चोरट्यांचा माग काढल्याची माहिती आहे. आमदार विठ्ठलराव लंघे यांनीही घटनास्थळी भेट देऊन माहिती घेतली.

# पेपर फुटी मागचा आका कोण ? हे तपासा : मा. शिक्षणमंत्री बाळासाहेब थोरात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर / पुणे** : पुण्यातील एमपीएससीच्या विद्यार्थ्यांचे आंदोलन हे देशात गेले आहे. देशातील हजारो युवक यामध्ये सहभागी होणार आहेत. पेपर फुटतात कसे ? , आंदोलनाची वेळ का येते ? असा सवाल करताना या सरकारच्या हेतू बद्दल शंका असून पेपर फुटी मागचा आका कोण हे तपासा व त्याला पकडा अशी आग्रही मागणी काँग्रेस नेते व माजी शिक्षण मंत्री बाळासाहेब थोरात यांनी केली असून विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला पाठिंबा दिला आहे. पुणे येथे एमपीएससीच्या विद्यार्थ्यांच्या सुरू असलेल्या आंदोलनाला काँग्रेस नेते तथा राज्याचे माजी शिक्षण मंत्री बाळासाहेब थोरात यांनी भेट देऊन पाठिंबा दिला यावेळी प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, आ. रोहित पवार, माजी मंत्री डॉ. विश्वजीत कदम, शिवराज मोरे, माजी आ. मोहन जोशी यांच्यासह विविध पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना मा.शिक्षण मंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले की, विद्यार्थ्यांनाही आंदोलन करण्याची वेळ का येते ? पेपर फुटतात कसे ? हा मोठा प्रश्न असून या सरकारच्या हेतू बद्दल मोठी शंका आहे. गोरगरिबांची, सर्वसामान्यांची मुले लहानपणापासून अभ्यास करतात. आई, वडील काबाडकष्ट करतात. एक वेळ अशी येते की, आपल्या मुलांनी मोठे व्हावे. कर्तबगारी




दाखवावी. ही मुले रात्रंदिवस अभ्यास करतात आणि अचानक पेपर फुटतो. सर्व भ्रमनिरास होतो. हे पेपर फुटतात कसे ?, त्यांचा आका कोण आहे ?. ते तपासा त्याला पहिले पकडा अशी मागणी करताना ठराविक लोकांकरता भ्रष्टाचारी मार्गाने पेपर फोडले जातात. यामुळे गोरगरिबांच्या मुलांवर अन्याय होतो. जे मुले रात्रंदिवस अभ्यास करतात. ते नापास होतात आणि भ्रष्टाचार करणाऱ्यांची मुले पास होतात.

पोलीस भरतीमध्ये काही संशय निर्माण झाल्याने तत्कालीन गृहमंत्री स्वर्गीय आर.आर. पाटील यांनी पोलीस भरतीमध्ये अत्यंत शिस्त लावली. जी आजपर्यंत सुरू आहे. त्यामध्येही आता या सरकारच्या काळात गडबड होण्याची शक्यता आहे. राज्यामध्ये ७०,००० जागा रिकाम्या आहेत. कृषी विद्यापीठांमध्ये ७० टक्के जागा रिकाम्या असून अवघे ३० टक्के लोक काम करत आहे. हे विद्यार्थी राज्याचे आणि देशाचे भांडवल आहे. युवा ताकद देशाच्या भवितव्यासाठी वापरणार कधी असा सवाल करताना परीक्षेनंतर तीन - तीन वर्ष निकाल लागत नाही भ्रष्टाचार होतो. अत्यंत दुर्दैवाचे आहे.

भारताचे माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांनी रेल्वेचा अपघात झाला म्हणून नैतिकतेने रेल्वे मंत्रीपदाचा राजीनामा दिला होता. या सरकारने तर शंभर वेळा राजीनामा दिला पाहिजे. खरे तर हे सरकार सत्तेवर राहण्याच्या लायक नाही. त्यांनीच राजीनामा दिला पाहिजे अशी मागणी ही त्यांनी केली. देशामध्ये लोकशाही राज्यघटना राहणार की नाही हे युवकांनी ठरवले पाहिजे. महाराष्ट्राने कायम देशाला जागे केले आहे. पुन्हा एकदा देश घडवण्याची ताकद महाराष्ट्राच्या युवकांमध्ये आहे. पुन्हा एक स्वातंत्र्य चळवळ उभी करण्यासाठी हे युवक निघालेले आहेत. चुकीचे जे आहे ते दुरुस्त करा आम्ही तुमच्या पाठीशी आहोत असेही काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांनी विद्यार्थ्यांना सांगितले असून विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला पाठिंबा दिला आहे. राज्याचे वरिष्ठ नेते मा. महसूल बाळासाहेब थोरात यांनी विद्यार्थी आंदोलनाला दिलेल्या पाठिंबामुळे उपस्थित राज्यभरातील सर्व विद्यार्थ्यांनी त्यांचे आभार व्यक्त केले आहेत.